www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक २९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, ०४ जून २०२४

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### घोडबंदर मार्गावर वाहतूक कोंडी कायम; बंदी असतानाही अवजड वाहनांची घुसखोरी.

● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे आणि मुंबई-अहमदबाद मार्गांना जोडणाऱ्या घोडबंदर मार्गिकेच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. कोंडी टाळण्यासाठी या मार्गावर जड वाहनांना बंदी घालण्यात आली असली तरीही रविवारी या वाहनांची वाहतूक सुरूच होती. त्यामुळे घोडबंदर मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. अवघे एक किलोमीटर अंतर कापण्यासाठी दोन तासांपेक्षा अधिक वेळ लागला. त्यामुळे चालकांकडून संताप व्यक्त केला जात होता.

अवजड वाहनांना बंदी असतानाही प्रवेश कसा दिला जातो, असा प्रश्न वाहन चालक विचारत आहेत. घोडबंदर मार्गावर पावसाळयात खड्डे पडत असतात. त्यामुळे येथील घाट रस्त्याच्या तात्पुरत्या स्वरूपात डागडुजीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जात आहेत. घोडबंदर मार्ग हा ठाणे तसेच मुंबई अहमदाबाद मार्गाला जोडतो. उरण येथील जेएनपीटी येथून जाणारी हजारो अवजड वाहने घोडबंदरमार्गे वसई किंवा गुजरातच्या दिशेने ये-जा करत असतात.

पान २ वर

## दुष्काळाबाबत राज्य सरकारने तातडीने पावलं उचलावीत, अन्यथा.., शरद पवारांचं मुख्यमंत्र्यांना पत्र

● मुंबई, यश सावंत :




महाराष्ट्रात मंगळवारी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. राज्यातील अनेक भागातील जनता दुष्काळाने होरपळत असल्याचा आरोप अनेक विरोधी पक्षनेत्यांनी केला आहे. याचदरम्यान महाराष्ट्रातील दुष्काळाबाबत शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे. दुष्काळाचा सामना करण्याची मागणी पवारांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे.

शरद पवार यांनी पत्रात लिहिले आहे की, “दुष्काळामुळे राज्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. पाण्याअभावी बळीराजा आणि सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. जनावरांसाठी पाणी आणि चारा टंचाई आहे. अशा परिस्थितीत या भीषण परिस्थितीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधूनही राज्य सरकारने कोणतीही ठोस भूमिका न घेतल्यास राज्यात दुष्काळाची स्थिती कायम राहिली आणि तातडीने पावले उचलली नाहीत तर महाराष्ट्रातील जनतेला नक्कीच संघर्ष करावा लागेल. राज्यातील दुष्काळ निवारणाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

■ शरद पवार यांनी पत्रात म्हटले आहे की, “गेल्या दहा दिवसांत दुष्काळी परिस्थिती अत्यंत भीषण बनली आहे. राज्यातील पाणीपातळीत लक्षणीय घट झाली आहे. संपूर्ण मराठवाड्यात भीषण जलसंकट आहे. उपाययोजना केल्या जात असतानाही, दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली नाही. नंदुरबार, नाशिक, जळगाव, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आणि इतर जिल्ह्यांमध्ये पाणीपातळी लक्षणीयरीत्या घटली आहे. “शहरी आणि ग्रामीण भागातील लोक पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करत आहेत. पुणे, कोल्हापूर, सांगली आणि इतर जिल्ह्यांमध्ये ही परिस्थिती आहे. महाराष्ट्र विशेषतः चिंतेत आहे.

## कायदा व सुव्यवस्थेसाठी अटल सागरी सेतूवर अवजड वाहनांना बंदी



● मुंबई, दिगंबर जाधव :

लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या असून चार जून रोजी मतमोजणी होत आहे. मुंबईतील शिवडी आणि दक्षिण मुंबई मतदार संघाची मतमोजणी शिवडी बंदर परिसरात होणार आहे. त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेसाठी अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मंगळवारी सकाळी सहा ते संध्याकाळी सहापर्यंत अटल सेतू वाहतूक जड अवजड वाहनांसाठी बंद असणार आहे तर हलक्या वाहनांची वाहतूक सुरु असली तरी त्यांना शिवडी येथे थांबता येणार नाही. वडाळा वाहतूक विभागाच्या हद्दीत शिवडी वेअर हाऊस, हे बंदर रोड, शिवडी पुर्व मुंबई येथे ३१ दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघ व ३० दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदार संघाचा स्ट्रॉंग रूम आहे. चार जून रोजी या ठिकाणी मत मोजणी असल्याने मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते जमा होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अटल सेतू शिवडी बाहेर जाण्याचा मार्ग (एक्झिट) येथे कोणत्याही प्रकारची अवजड वाहने तसेच माल वाहतूककरणारी वाहने यांना अटल सेतू दक्षिण वाहिनी येथून येण्यास मनाई करण्यात आली आहे.

पान २ वर

## निकालाची उत्कंठा! नवनीत राणा, बळवंत वानखडे , दिनेश बुबसह सर्वांचेच विजयाचे दावे

● नागपूर नितीन देवळेकर :



लोकसभा निवडणुकीचे निकाल मंगळवारी समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या बाजूने दोन मतदानोत्तर चाचण्यांनी तर महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखडे यांची आघाडी एका मतदानोत्तर चाचणीत कौल दर्शविण्यात आला असला, तरी अमरावतीतील सर्वच प्रमुख उमेदवारांनी विजयाचे दावे केले आहेत. मतदानोत्तर चाचण्या किंवा प्रसार माध्यमांमधून कितीही दावे केले जात असले, तरी अमरावती लोकसभा मतदार संघातून महाविकास आघाडीचाच विजय होईल, असा दावा काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे यांनी केला आहे. ते म्हणाले, निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सर्वांची साथ मिळाली. सर्वसामान्य जनता ही इंडिया आघाडीसोबत होती. आमचा विजय निश्चितपणे होईल. मतदारांनी महाविकास आघाडीला उत्स्फूर्त मतदान केले. आमचा विजय होईल, हा आत्मविश्वास आहे, तो जनतेनेच व्यक्त केला आहे.

अमरावती लोकसभा मतदार संघातून महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा या २ लाखांच्या मताधिक्याने निवडून येतील, असा दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे. रवी राणा म्हणाले, आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये देशाचा केलेला विकास, त्यांची लोकप्रियता यांचा निश्चितपणे फायदा मिळाला.

पान २ वर

## मुंबईतील मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज; दुपारी ३ पर्यंत निकाल लागण्याची शक्यता

● मुंबई, विशाल कारंडे :



लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबईतील सहाही लोकसभा मतदारसंघांतील मतमोजणीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मतमोजणी दुपारी ३ पर्यंत पूर्ण होईल, असे नियोजन करण्यात आले आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील दक्षिण मुंबई व दक्षिण मध्य मुंबई या दोन्ही लोकसभा मतदारसंघांची मतमोजणी शिवडी येथील वेअर हाऊस, गाडी अड्डा येथे होणार आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील उत्तर मुंबई, वायव्य मुंबई आणि उत्तर मध्य मुंबई या तीन मतदारसंघांची मतमोजणी ही नेस्को सेंटर, गोरेगावमध्ये होईल. ईशान्य मुंबई मतदारसंघाची मतमोजणी उदयांचल शाळा, विक्रोळी येथे होणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक यंत्रणेने दिली. सर्व ठिकाणी सकाळी ८ वाजता प्रत्यक्ष मतमोजणीस सुरुवात होणार आहे. सुरुवातीला टपाली मतमोजणीस सुरुवात होईल.

पान २ वर

## नवी मुंबई, ठाणे परिसरात पूर्वमोसमी पावसाची हजेरी



● नवी मुंबई, भावना जैन :

ठाणे, नवी मुंबईतील खारघर, कामोठे परिसरात सोमवारी पावसाने हजेरी लावली असून यामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. दरम्यान, राज्यात सोमवारपासून पूर्व मोसमी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. नवी मुंबईतील खारघर, कामोठे परिसरात सोमवारी १२ वाजता पावसाने हजेरी लावली. तसेच ठाण्यातही दुपारी १२.३० नंतर पाऊस पडायला सुरुवात झाली. याचबरोबर पश्चिम उपनगरातील पवई, सांताक्रूझ, बोरिवली परिसरात ढगाळ वातावरण होते. दरम्यान, राज्यातील काही भागात सोमवारपासून पूर्व मोसमी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अरबी समुद्रात मोसमी वाऱ्यांची वाटचाल सुरू झाली आहे. काही दिवसांत मोसमी वारे राज्यात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांना जातीय भेदभाव रोखण्याबाबत केले सतर्क

● पुणे, अभिजित येरल्लू :




विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी देशातील सर्व विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांना जातीय भेदभाव रोखण्याबाबत सतर्क केले आहे. जातीय भेदभावासंदर्भातील तक्रारींबाबत कार्यवाही करण्यासाठी विद्यापीठाच्या स्तरावर स्वतंत्र समितीची स्थापना करून त्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) प्रतिनिधींचा समावेश करण्याची सूचना करण्यात असून, गेल्या शैक्षणिक वर्षात घडलेल्या भेदभावाबाबतच्या प्रकरणांची माहिती मागवण्यात आली आहे.

युजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. जातीय भेदभाव रोखण्यासंदर्भात युजीसीने वेळोवेळी उच्च शिक्षण संस्थांना सूचना दिल्या आहेत. आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरू होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर नव्याने सूचना देण्यात आल्या आहेत. एससी, एसटी विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीमुळे भेदभाव होईल अशी कोणतीही कृती प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी करू नये. विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालय, उच्च शिक्षण संस्थेने जातीय भेदभावासंदर्भातील तक्रारी नोंदवण्यासाठी त्यांच्या संकेतस्थळावर एक पान तयार करावे. तसेच एक नोंदवही करावी. भेदभावासंदर्भातील प्रकार निदर्शनास आल्यास त्या बाबत तातडीने कार्यवाही करावी. कोणत्याही समाज किंवा जातीच्या विद्यार्थ्यांबाबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याची काळजी घेतली जावी. जातीय भेदभावाचे प्रकरण अत्यंत संवेदनशीलतेने हाताळण्यात यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या वर्षी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये घडलेल्या जातीय भेदभावासंदर्भातील घटनांची माहिती सादर करण्याचे निर्देशही युजीसीने उच्च शिक्षण संस्थांना दिले. त्यात विद्यापीठ स्तरावर समिती नियुक्त केली आहे का, तक्रार नोंदवण्यासाठी संकेतस्थळावर पान तयार केले आहे का, गेल्या वर्षभरात घडलेल्या घटना, तक्रारीमध्ये आत्महत्येसारखा प्रकार घडला आहे का, प्रकरण दाखल झाल्यानंतर केलेली कार्यवाही, दाखल झालेली प्रकरणे आणि सोडवलेली प्रकरणे आदी माहिती मागवण्यात आली आहे. त्यासाठी ३१ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

## लोकसभा निकालाच्या पार्श्वभूमीवर नाशिक पोलीस आयुक्तांचा गंभीर इशारा

### म्हणाले, सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकाल तर...



● नाशिक विशाल पाटील :

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचा मंगळवारी निकाल जाहीर होणार आहे. निकालाच्या दरम्यान नाशिक शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नाशिक शहर पोलिसांकडून चोख नियोजन केले जात आहे. तर सोशल मीडियावर देखील नाशिक पोलिसांची नजर असणार आहे. नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी सकाळी आठ वाजेपासून मतदान मोजणी प्रक्रियेला सुरुवात होईल. मतदान केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना येणारे मार्ग हे स्वतंत्र ठेवण्यात आले आहे. त्यासोबतच पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त परिसरामध्ये तैनात असणार आहे. तसेच सोशल मिडियावरदेखील नाशिक पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे .

पान २ वर

## “मी नेहमीच सर्वांसाठी काम केलं, मला निकालाची धाकधूक नाही, माझा विजय निश्चित”: पंकजा मुंडे



● बीड, सचिन कदम :

बीड लोकसभेचा निकाल काय लागणार? याची धाकधूक मला होत नाही. कारण माझ्या हृदयातील हुरहूरीची जागा साहेबांच्या जाण्यानं घेतली, यापेक्षा दुसरे मोठे दुःख माझ्या आयुष्यात असू शकत नाही. आज जिल्हयाला पिढी बिघडविणारे नव्हे तर पिढी घडविणारे नेतृत्व हवे आहे, त्यामुळे माझा निश्चित विजय होणार याची मला खात्री आहे, असा विश्वास भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी सोमवारी व्यक्त केला.

गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिदिनी हजारो कार्यकर्त्यांच्यासह मुंडे कुटुंबीय गोपीनाथ गडावर नतमस्तक झाले. यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या, दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे आजही आपल्या आचार, विचार आणि श्वासात जिवंत आहेत. मुंडे साहेबांनी आपलं संपूर्ण आयुष्य वंचित, पिडित व सर्व सामान्य वर्गासाठी खर्ची घातलं. अनेक दुर्लक्षित घटकांना, कार्यकर्त्यांना प्रवाहात आणलं. त्यांच्या विचाराचा वारसा आणि वसा जपण, त्यांचं स्वप्न पूर्ण करणं हे माझं दायित्व आहे. मी कधीही हा वसा खाली ठेवणार नाही, असा संकल्प पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला. तसेच बीड लोकसभा निकालावर देखील पंकजा मुंडे यांनी यावेळी मोकळेपणाने मत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, बावीस वर्षे राजकारणात काम करत असताना मी कधी संयम ढळू दिला नाही. प्रत्येकांना सोबत घेऊन काम केलं. मी कधी कुणाविषयी अभद्र बोलले नाही. समाजातील कुठल्या वर्गाला, वर्णाला शब्दाने घायाळ केलं नाही. मी नेहमीच जातीपातीच्या पलिकडे जावून सर्व वर्गासाठी काम केलं आणि पुढेही करत राहणार. यामुळे मला उद्याच्या निकालाची धाकधूक नाही, विजय निश्चित आहे, असा विश्वास देखील पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

पान २ वर

## विश्वविक्रम! लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने देशात ६४ कोटी २ लाख मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्यांत तब्बल ६२.३६ टक्के मतदान झालं आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने देशात विश्वविक्रम घडला आहे. कारण, या सात टप्प्यांत ६४ कोटी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली.

निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा देशात ६४ कोटी २ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. G7 मधील एकूण देशातील दीडपट अधिक तर, युरोपिअन युनिअनमधील २७ देशाच्या तुलनेत अडीचपट अधिक हे मतदान आहे. यंदा महिला मतदारांच्या संख्येतही वाढ झाली आहे. यामध्ये तब्बल ३१ कोटी १४ लाख महिला मतदार आहेत.

सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा करताना आयुक्त राजीव कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशात ९६.६ कोटी मतदार आहेत. यामध्ये ४९.७ कोटी पुरुष मतदार आणि ४७.१ कोटी महिला मतदार आहेत. यापैकी एकूण ६४ कोटी २ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजेच, यंदा देशात ६२. ३६ टक्के मतदान झालं आहे. यंदा मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याने निवडणूक आगोयाच्या आयुक्तांनी उभं राहून दाद दिली. जम्मू आणि काश्मीरमध्येही मोठ्या प्रमाणात मतदान झालं आहे. गेल्या चार दशकातील हे सर्वाधिक मतदान होतं, असंही राजीव कुमार यांनी स्पष्ट केलं.

## संपादकीय


# ‘मोफत’ची आश्वासने अन् आपली बलस्थाने

लोकशाहीमध्ये निवडणुका जिंकण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे जनतेला विविध गोष्टी मोफत देऊन उपकृत करणे आणि मते पदरात पाडून घेणे. आजही आपला देश १४० पैकी ८० कोटी म्हणजे ५७.१४ % जनतेला मोफत धान्य देतो. बऱ्याच वर्षांपूर्वी दक्षिण भारतात लोकांना मोफत तांदूळ देण्याची पद्धत सुरू झाली आणि निवडणुकीच्या राजकारणात याला यश येत आलेले पाहून ‘मोफत’चे प्रारूप सगळ्या देशात पसरले. मग काही ठिकाणी इतर वस्तूंचेही वापट होऊ लागले. पुढे याची व्याप्ती वाढली आणि मोफत वीज, मोफत बस प्रवास अशी मालिका सुरू झाली. यात आणखी ‘प्रगती’ झाली आणि शेतकऱ्यांच्या, महिलांच्या खात्यात थेट पैसे पाठवण्यापर्यंत हे लोण पसरले. परिणामी आज अशी स्थिती आली आहे की, लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या बहुतांश पक्षाच्या जाहीरनाम्यांतही आपण लोकांना काय मोफत देणार, हेच सांगण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर मोफतच्या खिरापतीचे राजकारण आधी नीट समजून घ्यायला हवे. जुन्या काळी बाळाला भूक लागली आणि ते रडू लागले की त्याला ग्राइप वॉटर देऊन झोपवले जायचे. ग्राइप वॉटरमध्ये काही प्रमाणात गुंगी आणणारे घटक असायचे. त्यामुळे बाळ ग्लानीमध्ये राहायचे. ‘मोफत’च्या घोषणा म्हणजे जनतेसाठी ग्राइप वॉटरच आहे. त्याशिवाय, या मोफतच्या योजनांचा अर्थव्यवस्थेवर पडणारा भार आणि निर्माण होणारी संभाव्य वित्तीय तूट या गोष्टी समजून घेण्यासारख्या आहेत. दुसरीकडे, खरोखरच जे मोफत मिळणे आपला अधिकार आहे, त्या आरोग्य आणि शिक्षणासारख्या गोष्टींपासून आपण आणखी दुरावतो, हे आपल्या लक्षातच येत नाही. म्हणून सामान्यांसाठी आवश्यक असलेल्या खर्चापासून लक्ष विचलित करण्यासाठी अशा ‘फुकट’ च्या गोष्टींचा अनेक वेळा वापर केला जातो. शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून मोठे आंदोलन उभे केले. या चळवळीचे ब्रीद होते.... ‘भिक नको, हवे घामाचे दाम’. शरद जोशींच्या या एका घोषणेत मोफत सुविधांच्या गाजरला न भुलण्याचे सार आहे. मोफत सुविधांच्या लाभामुळे मोठी कामे करुन घेण्याच्या आणि जगणे समृद्ध होण्याच्या संधींपासून वंचित राहण्याची मोठी किंमत आपल्याला मोजावी लागते.

समाजातील गरजू गरिब लोकांना खरेच संधी निर्माण करून देणार असाल आणि त्यातून त्यांचे जीवनमान उंचावणार असेल, तर ते टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही काय करणार आहात, या प्रश्नाचे निश्चित उत्तर वा त्यावरील उपाय कोणाकडेही नाहीत. नेत्यांचे फोटो असलेले मोफत धान्याचे पोते त्याच्या हातून स्वीकारताना आपल्या कुटुंबप्रमुखाची अगतिकता पाहून त्या कुटुंबातील लहान मुले, स्त्रियांचा स्वाभिमान आणि आयुष्यात काही करण्याची त्यांची इच्छा कशी लयाला जात असेल, याचा साधा विचारही आपण करत नाही. म्हणून आम्हाला फुकट काहीही नको, जे हवे ते आम्ही कमावून मिळवू. पण, आम्हाला त्यासाठी संधी, रोजगार, रस्ते, आरोग्य, शिक्षणाच्या सुविधा द्या, असा आग्रह प्रत्येकाने धरला पाहिजे. आज देशभरातील ७० % गरोदर स्त्रियांच्या शरीरात पुरेसे रक्त नाही. त्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे. पण, प्रसूती झाल्यावर त्यांच्या खात्यात ५ हजार रुपये टाकले जातात. ते बहुतांश नवऱ्याच्या किंवा कुटुंबीयांच्या खिशात जातात. काही पैसे खात्यात जातात, पण मूळ समस्या मात्र जशीच्या तशीच राहते. मोफत सुविधांमागच्या राजकीय विसंगतीचे आणि सामाजिक असंवेदनशीलतेचे हे उत्तम उदाहरण आहे.

‘मोफत’ची आश्वासने पूर्ण करायला पैसा कुठून येणार, हा प्रश्न कोणीही विचारत नाही. शिवाय, निवडणुका जिंकण्यासाठी उडवल्या जाणाऱ्या रेवड्यांवरचा पैसा हा जीएसटी आणि कररूपाने जमा होणारा आपलाच पैसा आहे, हेही आपण विसरतो. मोफत वाटपाच्या सुविधांमुळे निर्माण होणारी वित्तीय तूट अनेक पायाभूत सोयी-सुविधांना बाधा आणते. आज देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५७ % कर्ज आहे आणि व्याज भरण्यात शासनाचा बराच निधी खर्ची पडतो. केंद्रापेक्षा राज्य सरकारे या बाबतीत बिकट स्थितीत असतात. अशा स्थितीत सत्तेवर येणारे प्रत्येक सरकार स्वतःच्या पक्षाचे स्थान मजबूत करण्यासाठी मोफतच्या खैरातीवर तिजोरी रिकामी करणार असेल, तर कधी तरी अर्थव्यवस्था कोसळून आपलेही खिसे फाटू शकतात, एवढा दूरगामी विचार लोकांनी करणे गरजेचे आहे. तेलामुळे श्रीमंत बनलेल्या व्हेनेझुएलाने जनतेवर मोफत सुविधांची अशीच उधळण केली. काही वर्षात या देशाची जनता ऐतखाऊ होऊन देशाची अर्थव्यवस्था ढासळली. क्युबाचे मोफत सुविधांचे प्रारूप असेच मातीमोल ठरले. अलीकडच्या काळात श्रीलंकेची अर्थव्यवस्थाही अशाच बेजबाबदार धोरणांमुळे तळाला गेली होती. ज्यांनी नागरिकांवर ‘मोफत’ची उधळण केली, ते देश आर्थिक डबघाईला येऊन जगाच्या पटलावर अपयशी ठरले. आपल्या निवडणूक आयोगाने ‘मोफत’च्या अशा घोषणांविषयी राजकीय पक्षांना थोपवून बघितले. पण, आयोग आज फारसा कोणाला रोखण्याइतपत स्वायत्त राहिलेला नाही. सुप्रीम कोर्टानेही वेळोवेळी मोफत वितरणाच्या प्रारूपावर ताशेरे ओढले आहेत. अनेक श्रीमंत देशही आर्थिक मंदीसारख्या संकटात तग धरू शकत नाहीत. भारत हा तर अजूनही वित्तीय तूट असलेला देश आहे. तो आपल्याला मोफतच्या खैरातीवर आयुष्यभर कसा जगवू शकेल, याचा विचार आपण कधीतरी केला पाहिजे.



## आजची चित्रोळी

सरला वसंत आणि
ऋतु ग्रीष्म अवतरेल !
नभ आक्रमेल मेघांनी
धरती जलें भिजेल !!

मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,
विक्रोळी, मुंबई

पान १ वरून...

### घोडबंदर मार्गावर वाहतूक कोंडी कायम;...

राज्य परिवहन मंडळाच्या बसगाड्या (एसटी), महापालिका परिवहन विभागाच्या बसगाड्यांसह हलक्या वाहनांची वाहतूक येथून मोठ्या प्रमाणात होत असते. येथील दुरुस्ती कामामुळे वाहनचालकांना दररोज कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. रविवारी घोडबंदर मार्गावर कासार वडवली ते चेना पूलपर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. अनेक वाहने एकाच ठिकाणी थांबून होती. दुपारी कडाक्याचे उन्हात कोंडीमुळे दुचाकीस्वारांचे हाल झाले.

### कायदा व सुव्यवस्थेसाठी अटल सागरी...

या मार्गावर हलकी वाहने येण्यास परवानगी असेल. परंतु, त्यांना शिवडी एक्झीट येथे उतरण्यास मनाई करण्यात आली असून, त्यांना थेट कुलाबा एक्झीट व वडाळा एक्झीट येथून पर्यायी मार्गाने वाहतूक करण्यास परवानगी आहे. त्यावेळी वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला मार्ग मंगळवारी चार जून रोजी सकाळी सहा ते संध्याकाळी सहा दरम्यान बंद असणार आहे.

नवी मुंबई एमटीएनएल दक्षिण वाहिनी ते शिवडी बाहेर जाण्याचा मार्ग (एक्झीट) वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग अवजड वाहनासाठी पर्यायी मार्ग नवी मुंबई वाशी खाडी पूल मार्गे तर हलकी वाहनासाठी पर्यायी मार्ग – कुलाबा बाहेर जाण्याचा मार्ग (एक्झीट) व वडाळा बाहेर जाण्याचा मार्ग (एक्झीट) असणार आहे. सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही इतर जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने तसेच पोलीस वाहने, अग्निशमन बंब , रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

### निकालाची उत्कंठा! नवनीत राणा, बळवंत...

गेल्या पाच वर्षांमध्ये नवनीत राणा यांनी अमरावती लोकसभा मतदार संघात केंद्र सरकारच्या साहाय्याने विकास कामे खेचून आणली. देशात मोदींशिवाय पर्याय नाही, हीच जनभावना आहे. अमरावतीत महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांनी आम्हाला छुपा पाठिंबा दिला. अमरावतीत नवनीत राणा यांच्याशिवाय पर्याय नाही, हे निकालातून प्रतिबिंबित झालेले दिसेल.

प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार दिनेश बुब यांनी देखील विजयाचा दावा केला आहे. आमच्या सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोक आमच्या बाजूने होते. आमची पाटी कोरी होती. लोकांनी आम्हालाच पसंती दिली. पण, निकालात उद्या सर्वकाही स्पष्ट होणार आहे. पण, ज्या पद्धतीने भाजपच्या उमेदवाराकडून आक्रमकपणे विजयाचे दावे, जल्लोष केला जात आहे, हे धोकादायक आहे, असे दिनेश बुब म्हणाले. आमच्याकडे जनशक्ती होती. ही निवडणूक जनशक्ती विरूद्ध धनशक्ती अशीच होती, असा दावा त्यांनी केला.

अमरावती लोकसभा निवडणूक ही गेल्या दोन महिन्यापासून चर्चेत राहिली. विद्यमान खासदार असलेल्या नवनीत राणा यांनी भाजपाकडून निवडणूक लढवली तर महाविकासआघाडी तर्फे काँग्रेसचे दर्यापूर विधानसभेचे विद्यमान आमदार बळवंत वानखडे यांनी लोकसभेची निवडणूक लढवली. मात्र आमदार बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध करत प्रहार कडून ठाकरे गटाचे कट्टर शिवसैनिक दिनेश बुब यांना मैदानात उतरवत तिरंगी लढत केली.

### मुंबईतील मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज;...

त्यानंतर मतदान यंत्राद्वारे मतमोजणीस सुरुवात होणार आहे. प्रत्येक लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी करताना त्यातील समाविष्ट विधानसभा मतदारसंघनिहाय मतमोजणी केली जाईल. यामध्ये प्रत्येकी १४ टेबलवर ही मतमोजणी सुरू होईल. साधारणत: मतमोजणीचे विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रानुसार १८ ते २१ राऊंड होतील. सकाळी ११ वाजेपर्यंत कल तर दुपारी तीन वाजेपर्यंत निकाल लागेल, असा प्रयत्न आहे. यासाठी मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक, सूक्ष्म निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर मतमोजणीच्या ठिकाणी पुरेसा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

शहर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी संजय यादव यांनी आज शिवडी येथील मतमोजणी केंद्राची पाहणी करून मतमोजणीसाठी आवश्यक उपाययोजना आणि सोयीसुविधांचा आढावा घेतला. मतमोजणीच्या अनुषंगाने स्थापन करावयाचे विविध कक्ष, सोयीसुविधांची उभारणी, उमेदवारांसाठी व्यवस्था, माध्यम प्रतिनिधींसाठी माध्यम कक्ष, मतमोजणी पथके, आपत्कालीन कंट्रोल रूमची पाहणी करून चर्चा करण्यात आली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही आणि अखंडित व सुरळीत वीजपुरवठा राहील या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकारी यादव यांनी दिल्या

### लोकसभा निकालाच्या पार्श्वभूमीवर ...

नाशिक पोलीस आयुक्तांचा इशारा

आक्षेपार्ह पोस्ट आणि अफवा पसरवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणार असल्याचा इशारा नाशिक शहर पोलीस संदीप कर्णिक यांनी दिला आहे. सोशल मीडियावर पोस्ट काय होत आहे यावर देखील पोलीस ऑनलाइन सेलकडून नजर ठेवली जाणार आहे. त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी केले आहे.


जेमिनी इंस्ट्राटेक लिमिटेड कंपनी एम.आय.डी. सी. अंबड ते अंबड वेअर हाऊस ते पावर हाऊस अंबडकडे जाणाऱ्या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ग्लॅक्सो कंपनी मेन गेट अंबड लिंक रोड, ते संजीवनी बोटनिकल नर्सरीकडे जाणाऱ्या मार्गावरील अवजड वाहतुकीस प्रवेश बंद. अंबड गावाकडून दोंदे मळ्याकडे येणाऱ्या मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

### “मी नेहमीच सर्वांसाठी काम केलं, मला...

देशाच्या भवितव्यासाठी मोदींचं नेतृत्व आवश्यक

उद्याच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हॅटट्रिक करणार यात कसलीही शंका नाही. कन्याकुमारी येथे ज्याठिकाणी मोदींनी ध्यान केलं त्या स्वामी विवेकानंदांचे वाक्य आहे. ‘जितना कठीण संघर्ष होगा, जीत उतनीही शानदार होगी’ देशाचं राजकारण आता बदलत आहे. देशाला पुढे नेण्यासाठी, देशाच्या भवितव्यासाठी मोदींचं नेतृत्व आवश्यक आहे. २०४७ पर्यंत देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याचं त्यांचं स्वप्न आहे. ज्या मुंडे साहेबांनी पक्ष संघटनेसाठी आपलं उभं आयुष्य वेचलं त्यांच्या पुण्यतिथीच्या दुसऱ्या दिवशी सत्तेची हॅटट्रिक होणं यापेक्षा काय मोठं असेल, हे यश मुंडे साहेबांनी पक्षासाठी केलेल्या कष्टाच आहे, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

# विनोद सम्राट ; अशोक सराफ



मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा अशोक सराफ यांचा आज ७७ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७७ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली.

सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या.

वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत.

# ड्रग्ज, ट्रॅव्हल अ‍ॅन्ड ट्रॅप !

तस्करांचा तसेच दहशतवाद्यांचा प्रत्येक डाव उधळून लावण्याकरिता विमानतळांवरील तपास यंत्रणेने दक्ष राहून काम करणे गरजेचे आहे. शंका आल्यास प्रवाशांची झडती घेणे तसेच अटकेसारखी कारवाई करणेदेखील आवश्यक. कायद्याची अंमलबजावणी करणार्या एजन्सीजमुळे गुन्हेगारीशी लढा देण्यास मदत होते. परंतु अनेकदा या एजन्सीच्या जाळयात निष्पाप लोकदेखील अडकून आपल्या आयुष्यातील मौल्यवान दिवस तुरुंगात घालवितात. या विषयाकडे अनेक वर्षे दुर्लक्ष झाले. पण ओनिबा आणि शरीक कुरेशी तसेच अभिनेत्री क्रिसन परेरा प्रकरणांनी अनेक कायदातज्ज्ञांचे व आंतरराष्ट्रीय घडामोडींवर पाळत ठेवणार्यांचे लक्ष वेधून घेतले होते.

ओनिबा आणि शरीक कुरेशी हे मुंबईस्थित जोडपे जुलै 2019 मध्ये ड्रग्ज तस्करी प्रकरणात कतार देशात अडकले. त्यांना अडचणीत आणणारे दुसरे तिसरे कोणी नसून शरीकची मावशी तबस्सुम कुरेशी होती. तिने लग्नाची भेट म्हणून ओनिबा आणि शरीकसाठी कतारची तिकिटे दिली तसेच हॉटेलमध्ये राहण्याची सोयदेखील केली. प्रवासाच्या दिवशी कतार येथील नातेवाईकांना देण्याकरिता कायदेशीर असलेला तंबाखूजन्य पदार्थ घेऊन जाण्याचा आग्रह केला. मात्र, कतारच्या हमाद आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्यानंतरच या जोडप्याला अटक करण्यात आली. कारण, तेव्हा सोबत असलेल्या बॅगांमध्ये तंबाखू नसून 4. 1 किलो हशीश, चरस असल्याचे समजले. अटकेनंतर कतार येथील कनिष्ठ न्यायालयाने त्यांना जन्मठेप आणि एक कोटी रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

शरीकच्या वडिलांनी एक वकील नियुक्त केला आणि कतारमध्ये मुलाला व सुनेला कायदेशीर प्रक्रिया करून सोडविण्यासाठी 15 महिने घालवले. त्यांनी दिल्लीतील एनसीबी संचालकाकडे तबस्सुम कुरेशी विरोधात तक्रार दाखल केली. मुलाने मावशीबरोबर केलेली संभाषणे या केसमध्ये महत्त्वाचे पुरावे ठरले. एजन्सीच्या तपासात तबस्सुम कुरेशीवरील आरोप सिद्ध झाले. तिला अटक करण्यात आली. कतार सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर लढाई जिंकल्यानंतर ओनिबा आणि शरीक कुरेशी यांना भारतात परतण्याची परवानगी देण्यात आली. एकंदरीत, कतारच्या तुरुंगात 21 महिने घालवल्यानंतर त्यांना स्वातंत्र्य मिळाले.

नातेवाईक असो किंवा इतर कोणी, परदेशात जाताना विश्वास ठेवून कोणाचेही सामान बरोबर घेऊ नका. भारतातून बाहेर जाणार्या प्रवाशांचे देखील सामान (लगेज) अंमलीपदार्थांसाठी तपासायला हवे. भारतातील विमानतळांची सुरक्षा कडक करण्याची गरज आहे, खासकरून बेंगळुरू विमानतळाची. कतार येथील जेलमध्ये अडकलेले अनेक लोक बेंगळुरू विमानतळावरून निर्गमन होणार्या विमानातून आले. या विमानतळावर लगेजची तपासणी नीट होत नसल्याचा लोक फायदा घेतात, असे मत ओनिबा कुरेशी यांनी पत्रकारांसमोर मांडले.

अभिनेत्री क्रिसन परेरा केससुद्धा लक्षवेधक आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांच्या कामाची प्रशंसा करू तितकी कमीच. तपास अधिकार्यांच्या माहितीप्रमाणे, बोरिवली परिसरात बेकरी चालविणार्या 35 वर्षीय अँथनी पॉलने क्रिसन परेराला गांजा तस्करी प्रकरणात अडकवले. लॉकडाऊनदरम्यान, पॉल यांचा क्रिसनच्या आईशी वाद झाला होता. त्याने कुटुंबाला धडा शिकवण्याचे ठरवले. इस्लामिक देशांमध्ये अंमलीपदार्थविरुद्ध कठोर कायद्यांबद्दलचा एक व्हिडिओ पाहिल्यानंतर त्याने एकूण 5 जणांना ड्रग्ज प्लांट करून अडकविण्याची योजना आखली.

पॉलने यासाठी स्वतःचा मित्र राजेश बोराटे ऊर्फ रवी याची टॅलेंट मॅनेजर म्हणून परेराशी ओळख करून दिली. बोराटेने अभिनेत्रीला भेटताच एका आंतरराष्ट्रीय वेबसीरिजसाठी कलाकारांची शारजाह ( संयुक्त अरब अमिराती - यूएई ) शहरात ऑडिशन सुरू असल्याची खोटी माहिती दिली. तिला ऑडिशनसाठी त्वरित यूएईला जाण्यास सांगितले व स्वतः अभिनेत्रीसाठी विमानाचे तिकीटही बुक केले. 1 एप्रिल रोजी शारजाहसाठी रवाना होताना बोराटे यांनी क्रिसनला एका परिचिताची पुरस्कारात मिळालेली ट्रॉफी घेऊन जाण्यास विनंती केली. यूएईमध्ये पोहोचल्यावर विमानतळावर कोणीतरी येऊन ती घेऊन जाईल, असे आश्वासन दिले. ती शारजाहमध्ये उतरली, ट्रॉफी नेण्यास कोणी आले नसल्याने तिने त्याबाबत अधिकार्यांना माहिती दिली.

ट्रॉफीची तपासणी करताना त्यात गांजा सापडल्याने तिला लगेच अटक करण्यात आली. परेरा कुटुंबीयांच्या सांगण्यावरून मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास सुरू केला. तपासादरम्यान, अँथनी पॉल आणि राजेश बोराटे यांनी कट रचून क्रिसनला अंमलीपदार्थ तस्करीच्या गुन्ह्यात अडकविल्याचे उघडकीस आले. अँथनी पॉलच्या या सापळयात अडकलेल्या 5 जणांपैकी एक डीजे क्लेटन रॉड्रिग्स याच्यावरदेखील गांजा / अफूची तस्करी केल्याचा आरोप आहे. लोकांना इस्लामिक देशातील विमानतळांवर अंमलीपदार्थ तस्करीच्या खोट्या प्रकरणात अडकवणे खूप सोपे आहे का ? भारतात विविध विमानतळांवर विमानाचे निर्गमन होण्याआधी प्रवाशांची व सामानाची कसून तपासणी का केली जात नाही? मुंबईस्थित आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञांपैकी एक वकील आनंद पांडे यांनी काही मुद्द्यांवर आपले मत मांडले.

निर्गमन करणार्या प्रवाशांची संख्या जास्त असते. त्यांच्या तपासणीला जवळजवळ सर्वच देशात कमी प्राधान्य दिले जाते. आपला देश सोडून परदेशात जाणार्या व्यक्तीच्या सामानात अंमलीपदार्थ लपवून त्याला खोट्या तस्करी प्रकरणात गोवणे सोपे आहे. पीडित प्रवासी (ज्याच्या सामानात अंमलीपदार्थ पेरले गेले आहेत) त्याच्या मायदेशातून बाहेर पडताना केवळ इमिग्रेशन तपासणी आणि सुरक्षा तपासणीला सामोरे जातो. अर्थातच सीमाशुल्क तपासणी केली जात नाही. तथापि, तो संबंधित गंतव्य विमानतळावर ( फाइनल डेस्टिनेशन) उतरल्यानंतर त्याची सीमाशुल्क तपासणी ( कस्टम्स ऑपरेशनच्या क्षेत्रातील तपासणी) होते. त्यामुळे देशाबाहेर जाताना अंमलीपदार्थ सामानात सहज दिसतील असे ठेवले तरच विमानतळावर सुरक्षा कर्मचार्यांना ते सामान स्कॅन करताना आढळून येतील.

तसे न झाल्यास केबिन लगेज व मोठ्या बॅगांमध्ये लपविलेल्या पदार्थांचा शोध लागणे अवघड आहे. याव्यतिरिक्त, काही लोक तस्करी करताना अंमलीपदार्थ कॅप्सूलमध्ये भरून त्या गिळतात. सुरक्षा कर्मचारी अशा व्यक्तींना मायदेशातून बाहेर जाताना ओळखून पकडू शकत नाहीत. सुरक्षा कर्मचारी मेटल डिटेक्टर, एक्स-रे मशीनद्वारे प्रवाशांना व सामानाला स्कॅन करतात. सामान्य मेटल डिटेक्टर केवळ कपड्यांमध्ये किंवा शरीराच्या आत लपवलेल्या धातूच्या वस्तू, हत्यार, चाकू इत्यादी दर्शवू शकतात. ही साधने निषिद्ध पदार्थांच्या गिळलेल्या कॅप्सूल शोधू शकत नाहीत. याउलट, बाहेरून देशात येणार्या प्रवाशांचे अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त स्कॅनिंग उपकरणांच्या साह्याने तपासले जाते. म्हणूनच व्यक्ती त्याच्या गंतव्य विमानतळावर पोहोचल्यानंतरच सर्व काही उलगडते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# श्रमिक जनता संघ युनियनच्या अध्यक्षपदी मेधा पाटकर यांची फेरनिवड

● कल्याण : श्रमिक जनता संघ युनियनची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी कल्याण येथे पार पडली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांची युनियनच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी फेरनिवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय महासचिव पदावर सामाजिक कार्यकर्ते जगदीश खैरालीया, उपाध्यक्ष पदी डॉ. संजय गोपाळ, खजिनदार म्हणून अविनाश नाईक, सह खजिनदार पदावर सुदर्शन साहू, सचिव पदावर सुनील कंद आणि संजय चौहान यांची पुढील काळासाठी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

कार्यकारी समिती सदस्य म्हणून अर्चना पवार, अनिता कुमावत, गणेश चव्हाण, संतोष देशमुख, बापू ओव्हाळ, सूरज वाल्मिकी, गौतम सहानी, पुजा पंडित, रोशन गायकर सुखेंदु मडैया, दुर्गेश खवसे राजकुमार दुबे, रामसुशील विश्वकर्मा, संतोष गुप्ता, बैजनाथ यादव, कृपाशंकर मिश्रा, चंद्रकांत चौधरी, विरेंद्र सावंत, नवीन मिश्रा आदी आणि कार्यालयीन सचिव म्हणून अजय भोसले यांची निवड करण्यात आली.







कल्याण येथील श्री लक्ष्मीनारायण देवस्थान मंगल कार्यालय येथे १ व २ जून रोजी कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा आणि राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान युनियनच्या अध्यक्ष मेधा पाटकर यांनी भूषविले. महासचिव जगदीश खैरालिया यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. संजय गोपाळ यांनी सूत्रसंचालन केले.

अधिवेशनात सरकारने चार लेबर कोड रद्द करून सर्व कामगार कायदे पुन्हा अंमलात आणावे, मैला सफाईचे काम यांत्रिक पद्धतीने करावे, मैन्युअल स्कैवेंजिंग प्रतिबंध कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करावी, खाजगीकरण – कंत्राटीकरण पध्दत बंद करून कायम नोकरी द्यावी, समान कामाला समान वेतन अदा करा, कमीत कमी किमान वेतन कायद्यानुसार वेतन मिळालेच पाहिजे, वर्षानुवर्षे मछली विक्री व्यवसाय करणाऱ्यांचे सर्वेक्षण करून अनुज्ञप्ती पत्र/लायसन्स द्यावे, फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करा, गीग कामगारांसाठी कामगार कायदे लागू करा, ग्लोबल वार्मिंग आणि वाढत्या उष्णते पासून कष्टकरी श्रमिकांना सुरक्षा सुविधा पुरविल्या जाव्या, मध्यप्रदेश येथील सेंच्युरी, मराल आणि पीडीपीएल कारखान्यातील श्रमिकांना न्याय मिळवून देण्यासाठी पाठींबा देत विविध ठराव ही मंजूर करण्यात आले.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या कंत्राटी कामगारांच्या २०१५ पासूनच्या किमान वेतनाचा फरकाची सुमारे सात कोटी रक्कम त्वरित अदा करा, ठाणे महानगरपालिका, प्रादेशिक मनोरूग्णालय, मध्य रेल मधील कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर युनियनच्या वतीने आंदोलन छेडण्याचा निर्धार अधिवेशनात समारोप सत्रात करण्यात आला.

## भाजपा आमदार किसन कथोरे यांची भाजपातून हकालपट्टीची माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांची मागणी

● कल्याण :- भाजपाचे माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत भिवंडी लोकसभेत पक्षाचे उमेदवार कपिल पाटील यांना "पराभूत"करण्यासाठी आमदार किसन कथोरे यांनी त्यांच्या समर्थकांमार्फत प्रयत्न केले म्हणूनत्यांची पक्षातून हकालपट्टी" करण्याबाबत मागणी केली असल्याने ऐन निवडणूक निकालाच्या तोंडावर भाजपा मधील अंतर्गत कुरघोडीच्या राजकारणाचा केंन्द्रीय पंचायत राज मंत्री कपिल पाटील यांना निवडणूक निकालात फटका बसणार का अशा राजकीय वुर्तळात खमंग चर्चा रंगल्या असल्याचे चित्र दिसत आहे.

माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी महाराष्ट्र चे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ३१ मे २०२४ रोजी दिलेल्या पत्राच्या आशयात भिवंडी लोकसभेत पक्षाचे उमेदवार कपिल पाटील यांना "पराभूत"करण्यासाठी मुरबाडचे भाजपा आमदार किसन कथोरे यांनी त्यांच्या समर्थकांमार्फत प्रयत्न केले म्हणूनत्यांची पक्षातून हकालपट्टी" करण्याबाबत मागणी पत्राद्वारे जगन्नाथ पाटील यांनी केली आहे. लोकसभेच्या निवडणूकीत सर्वानी चांगले काम करून विजय मिळावा यासाठी आपणचांगले प्रयत्न केले त्याबददल सर्व कार्यकर्त्यांकडून मनापासून धन्यवाद व आभारही जगन्नाथ पाटील यांनी मानले आहेत. .४/५ महिन्यापूर्वी उपमुख्यमंत्री यांच्या सागर बंगल्यावर आपण स्वतः, रविंद्र चव्हाण, कपिलपाटील, किसन कथोरे आणि अशी बैठक आयोजित केल्याचे दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्यावेळी कपिल पाटील यांनी त्यांचे काही आक्षेप स्पष्ट पणे मांडले.

पण किसन कथोरेनी कोणताही खुलासा याबाबत केला नाही. पण मी जेष्ठतेच्या नात्याने खासदारांना थांबवले नाही म्हणून नाराजी दाखविली. माझे फोन उचललेनाहीत.९ एप्रिल २०२४ रोजी आपण त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले.१३ एप्रिल २०२४ रोजी आपण मुरबाडमध्ये मेळावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भिवंडी व कल्याण या दोन मतदारसंघासाठी कल्याणला सभा झाली. त्यावेळी त्याच ठिकाणी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, कपिल पाटील, किसन कथोरे, रविंद्र चव्हाण आणि मी उद्या मुरबाडला येत असल्याचे सांगत जिल्हा परिषदेच्या ४मेळावे (बैठका) आयोजित करा असे सांगितले. त्याप्रमाणे भाजपा प्रदेश अध्यक्ष १६ एप्रिलला आले. ४ मेळावे झाले उमेदवार आणि कथोरे यांची भाषणे झाली.त्यानंतर आमदार किसन कथोरेंनी उमेदवार कपिल पाटील त्यांना पराभुत करण्यासाठीत्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांना सांगीतले ज्या ठिकाणी आगरी समाजाची गांवे आहेत अशा ठिकाणी तुतारीला मतदान करा आणि जेथे कुणबी समाजाची गावे आहेत तेथे निलेश सांबरे याअपक्ष उमेदवाराची शिलाई मशिनला मतदान करा असे सक्त ताकीद देऊन कार्यकर्त्यांना कामालालावले. आतापर्यंत अशी १०० कार्यकर्त्यांची यादी तयार आहे.आपण राज्यातील आणि देशातील सर्वोच्च नेते आहात पण आपल्या प्रयत्नाला"काडीचीही किंमत दिली नसल्याचे फडणवीस यांना दिलेल्या पत्रात जगन्नाथ पाटील यांनी म्हटले आहे .तसेच पक्षाचे प्रदेश अध्यक्षांच्या प्रयत्नांना धुडकावून लावले.त्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यामध्ये खूप असंतोष निर्माण झाला असून प्रचंड खदखद प्रत्यक्षात आपल्या निदर्शनात आल्याचं पाटील यांनी म्हटले आहे. पक्षाच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली असून यामुळेच आमदार किसनकथोरे ह्यांची पक्षातून हकालपट्टी करावी अशा निवेदनाची विनंती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

किसन कथोरे यांना ठाणे ग्रामीण जिल्हयाचे अध्यक्ष केले होते पण त्या ३/४ वर्षामध्ये एकदाही जिल्हा बैठक, तालुका बैठक आयोजित केली नसल्याचे सांगितले गेले आहे .याची कटाक्षाने नोंद घेण्याचे माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

## थोडक्यात



### जागतिक पर्यावरण दिनी 5 जूनला नवी मुंबई महापालिका संकलित करणार आंब्याच्या कोयी

● नवी मुंबई - फळांचा राजा म्हणून ओळखला जाणारा आंबा प्रत्येकाचे अत्यंत आवडीचे फळ आहे. रसाळ आंबा खाऊन तृप्त झाल्यानंतर त्या आंब्याची कोय सर्वसाधारणपणे ओल्या कच-यात टाकून दिली जाते. मात्र ही कोय जर मातीत रूजवली तर त्यापासून पुन्हा रसाळ आंबे देणारे झाड उगवू शकते आणि पुढच्याही पिढ्यांना तृप्त करू शकते तसेच त्याच्या थंडगार पर्णछायेखाली गारवाही मिळू शकतो. नेमकी हीच गोष्ट लक्षात घेत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून 5 जून रोजीच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन व उद्यान विभागांच्या वतीने आंब्याच्या कोयी संकलित करण्याचा एक अत्यंत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जात आहे. स्वच्छ सर्वेक्षणाप्रमाणेच माझी वसुंधरा अभियानातही नवी मुंबई हे राज्यातील अग्रणी शहर असून यामध्ये सुजाण नवी मुंबईकर नागरिकांच्या सक्रिय सहभागाचा सिंहाचा वाटा आहे. म्हणूनच या अभियानांना पूरक असा नवी मुंबईच्या घराघरातून आंब्याच्या कोयी संकलित करून त्यामधून वृक्षसंपन्नता वाढविणारा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत 5 जून रोजी नवी मुंबईतील सोसायट्यांमधून तसेच ज्युस सेंटर्स, रेस्टॅरंट्स व हॉटेल्स अशा ठिकाणांहून आंब्याच्या कोयी स्वतंत्ररित्या ंकलित करून घेतल्या जाणार असून त्याच्या वृक्षरोपांतून निसर्गाचे देणे निसर्गालाच परत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या माध्यमातून ओला, सुका व घरगुती घातक अशा 3 प्रकारे वर्गीकरण होणा-या कच-यामधील आंब्याच्या कोयींचे स्वतंत्र वर्गीकरण होऊन त्याचा उपयोग पर्यावरण संवर्धनासाठीही होणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारचे 'स्वच्छ भारत अभियान' आणि महाराष्ट्र शासनाचे 'माझी वसुंधरा अभियान' या दोन्ही महत्वाच्या अभियानांना सामावून घेणारा हा पूरक उपक्रम आहे. तरी नवी मुंबईकर नागरिकांनी आजपासून आपल्याकडील आंबे खाऊन झाल्यानंतर उरलेल्या आंब्याच्या कोयी नेहमीच्या ओल्या कच-यात टाकून न देता त्या पाण्याने धुवून स्वच्छ कराव्यात व 5 जून रोजी नवी मुंबई महानगरपालिकेने स्वतंत्र संकलनाची व्यवस्था केलेल्या वाहनात द्याव्यात आणि जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी पर्यावरण संवर्धनात आपलाही सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## शहापूर तालुक्यातील बोराळे पाडा भागातील विद्यार्थ्यांसाठीची यांत्रिक बोट चालू स्थितीत; जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार प्रकल्प अधिकाऱ्यांनी केली पाहणी

● ठाणे (जिमाका) - तानसा धरणक्षेत्रातील बोराळे पाडा ते सावरदेव पाडा भागातील मुलांना शाळेत ये जा करण्यासाठी दिलेली बोट बंद असल्याबाबतच्या बातम्या प्रसार माध्यमांमध्ये प्रसारित झाल्या होत्या. या गोष्टीची शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन बोट चालू असल्याची खात्री केली तसेच त्या बोटीतून स्वतः व वर्षभर प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यासह प्रवास केला. त्यामुळे यासंबंधी प्रसारित झालेल्या बातम्यांमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. शहापूर तालुक्यातील बोराळे भागातील मुलांना शाळेत जा ये करण्यासाठी जुन्या बोटीचा वापर होत होता. परंतु या बोटी धोकादायक असल्याने राज्य शासनाने या विद्यार्थ्यांसाठी नवीन यांत्रिक बोट वर्षभरापूर्वी दिली होती. राज्य शासनाने दिलेली ही यांत्रिक बोट बंद असल्याबाबतच्या बातम्या प्रसारित झाल्यानंतर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी तातडीने याची दखल घेऊन शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री. हिवाळे यांना जागेवर जाऊन चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आज प्रकल्प अधिकारी श्री हिवाळे यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. त्यावेळी राज्यशासनाने दिलेली यांत्रिक बोट सुरू असल्याचे दिसून आले. तसेच ही बोट सुरू करून त्यातून त्यांनी व उपस्थित विद्यार्थ्यांनी फेरी ही मारली. सध्या शाळांना सुट्ट्या असल्याने या यांत्रिक बोट थांबलेली आहे. शाळा सुरू होताच ही बोट पुन्हा वापरात येऊ शकेल. या पाहणी वेळी या बोटीचा वर्षभर वापर करणारा विद्यार्थी कैलाश चिमडा व सावरदेव मधील नागरिक प्रदीप हे सुद्धा उपस्थित होते. ही बोट वर्षभर सुरू होती व पेट्रोल ची कोणतीही अडचण नव्हती. सध्या शाळा बंद असल्याने बोटीचा वापर होत नव्हता. परंतु ही बोट चालू स्थितीत असल्याचे श्री. प्रदीप यांनी यावेळी सांगितले. या बोटी शिवाय एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांनी या वर्षी न्यूक्लिअस बजेट योजनेतून आणखी एक नवीन आधुनिक यांत्रिक बोट येथे उपलब्ध करून दिली आहे.



## मान्सुन पुर्व शहर स्वच्छता मोहीम

● मीरा-भायंदर - आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या आदेशान्वये अति. आयुक्त अनिकेत मानोरकर व मा. उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 01/06/2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सखोल स्वच्छता अभियान (भाग- 03) मान्सून पूर्व शहर स्वच्छता अभियान राबविण्यात आले सदर मोहीम अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 1 व 2 यामध्ये मान्सून पूर्व शहर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्सकाढणे, प्लास्टिक पिशवीबंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळेधुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छला अशी असंख्य कामेशकाळी 7.30 ते 10.00 वाजे पर्यंत करून घेतली. मा. अति. आयुक्त व मा. उपायुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्तासफाई मोहीम राबवली. तसेच परिसरात भेट देऊन अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश दिले.

सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या गोहीगेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन ना. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात गैस आहे.



## पत्रकार रविंद्र जाधव यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

● कर्जत ( प्रतिनिधी) - पत्रकार रायगड भूषण श्री रविंद्र विष्णू जाधव यांना नुकताच आशिया इन्टरनॅशनल कल्चर युनिव्हर्सिटी बॅंगलोर, तामिळनाडू यांचेकडून डॉक्टररेट पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी मास्टर व्ही,बाबू विजयन -फांऊडर अॅंड हेड कोच विजैन अॅकेडमी अॅडव्हाईसरी बोर्ड आशिया इन्टरनॅशनल कल्चर अॅकेडमी, डॉ के ए मनोकरन तामिळनाडू वर्किंग प्रेसिडेंट,आय,एन टी यु सी इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस., डॉ जे हरिदास -असिसंट जज ऒ पी, डॉ पी राधाकृष्णन -इंडियन आफ्रिका आर ट्रेड कॉन्सिल -कमिशर -इंडीयन नामिबिया ट्रेड कॉन्सिल कमिशनर. डॉ कोपुल्ला विजयकुमार -नॅशनल चेअरमन -सोशल जस्टिज फॉर वल्ड ह्यूमन राईट्स कॉन्सिल, डॉ .शिवाप्पा केणी -ऑनकॉलॉजी थेरपिस्ट एम बी बी एस एन टी आर टी एच सी जी हॉस्पिटल बंगलोर, नितेश शरण -बीजेपी समर्थक मंच स्टेट प्रेसिडेंट कर्नाटक आदि मान्यवर उपस्थित होते यावेळी सन्मानचिन्ह, ल्ड मेडल देऊन मान्यवरांचे समवेत गौरविण्यात आले हा कार्यक्रम होसुर येथील इन्टरनॅशनल हिल्स मध्ये घेण्यात आला यावेळी विविध क्षेत्रातील व्यक्तींना डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.



## जमिनीच्या वादातुन झालेल्या हत्येचा ३६ तासात उलगडा

### मानपाडा पोलीसांनी केली आरोपीला अटक





● कल्याण : जमिनीच्या वादातून उंबर्लि गावात राहणाऱ्या संजय भोईर या इस्टेट एजंटची धारधार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या हत्येचा अवघ्या ३६ तासांत उलगडा करत हत्या करणाऱ्या आरोपी विकास पाटील याला मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. संजय भोईरने आपल्याला मारण्याची सुपारी दिली असल्याच्या संशयातून हि हत्या केल्याची कबुली विकासने दिली आहे.

मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत संजय भोईर यांची हत्या झाल्यानंतर मानपाडा पोलीस स्टेशनचे वपोनि विजय कादबाने यांनी या गुन्हयाचे तपास अधिकारी पोनि दत्तात्रय गुंड, गुन्हेप्रकटीकरण पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे विशेष पथक स्थापन करून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मार्गदर्शन करून पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी आरोपीचा सीसी टीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणा आधारे तपास करून तसेच बातमीदाराच्या मार्फतीने गुन्हयातील अज्ञात आरोपी निष्पन्न करून आरोपी रिक्षा चालक विकास पाटील याला अटक केली.

मयत संजय भोईर आणि आरोपी विकास पाटील यांच्यात असलेल्यां जुन्या जामिनीच्या वादातुन संजय भोईर हा विकास याचा काटा काढणार असल्याचा संशय विकासला होता. त्याचा मनात राग धरून विकास याने संजय याला ऐकांतात गाठुन धारदार शस्त्राचे साहयाने गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले. या गुन्हयात विकास याला अटक करण्यात आली असून त्याचा साथीदाराचा शोध घेणे चालु असुनब या गुन्हयाचा तपास पोनि दत्तात्रय गुंड हे करत आहे.


हि कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि विजय कादबाने, पोनि राम चोपडे, दत्तात्रय गुंड, राहुल मस्के, सपोनि प्रशांत आंधळे, महेश राळेभात, संपत फडोळ, पोहवा राजेंद्र खिलारे, सपोउपनिरी. भानुदास काटकर, पोहवा सुनिल पवार, संजु मासाळ, विकास माळी, शिरीष पाटील, दिपक गडगे, निसार पिंजारी, पोना. गणेश भोईर, प्रविण किनरे, अनिल घुगे, शांताराम कसबे, देवा पवार, यलप्पा पाटील, रवि हासे, चिंतामण कातकडे, पोशि. गणेश बडे, नाना चव्हाण, विजय आव्हाड, अशोक आहेर, महेंद्र मंजा यांच्या पथकाने केली आहे.

## बेलापूर विभागातील अनधिकृत झोपड्यांवर कारवाई



● नवी मुंबई - डॉ. कैलास शिंदे, आयुक्त यांच्या निर्देशानुसार डॉ. राहूल गेठे उप आयुक्त (अतिक्रमण) यांचे आदेशान्वये, श्री. शशिकांत तांडेल सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी - बेलापूर, यांचे नियंत्रणाखाली तसेच श्री. मयुरेश पवार, कनिष्ठ अभियंता व श्री. स्वप्निल तारमळे, वरिष्ठ लिपिक/कर निरिक्षक, श्री. नयन भोईर, सागर पाटील, रविंद्र पाटील लिपिक यांचे उपस्थितीत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत झोपडयांच्या निष्कासनाच्या कारवाई करीता उपस्थित होते. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, दुर्गामाता नगर, सेक्टर-8B, सी.बी.डी. बेलापूर येथिल असलेल्या अनधिकृत झोपडया स्वत:हून हटविने आवश्यक होते. अे विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाईचे आयोजन करुन दुर्गामाता नगर, सेक्टर-8B, सी.बी.डी. बेलापूर येथिल 57 अनधिकृत झोपडया निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील अधिकारी/कर्मचारी, मजूर-15, वाहन आयचर-01, पिकअप-01 तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# विराट कोहलीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा



● भारतीय संघाचा स्टार खेळाडू विराट कोहली सध्या टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत खेळण्यासाठी अमेरिकेत आहे. अमेरिकेत आयसीसीने कोहलीला आयसीसी 'वनडे प्लेयर ऑफ द मॅच २०२३' या पुरस्काराने सन्मानित केले आहे. कोहलीला हा पुरस्कार गेल्या वर्षीच जाहीर होता, मात्र त्याला अमेरिकेत या पुरस्काराची ट्रॉफी प्रदान करण्यात आली. आयसीसीने पुरस्कारासोबतचा कोहलीचा फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे, जो चाहत्यांना खूप आवडला असून त्यावर विराटला शुभेच्छा देत आहेत.

विराट कोहलीने २०२३ मध्ये आपल्या बॅटने शानदार प्रदर्शन केले होते. विराटने २७ एकदिवसीय सामन्यांमध्ये ६ शतके आणि ८ अर्धशतकांसह एकूण १३७७ धावा केल्या होत्या. २०२३ मध्ये कोहलीची सर्वोत्तम धावसंख्या नाबाद १६६ धावा होती. एवढेच नाही तर कोहलीने एकदिवसीय विश्वचषकात आपल्या फलंदाजीने सर्वांना प्रभावित केले होते. विराटने एकदिवसीय विश्वचषकाच्या ११ सामन्यात ७६५ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये त्याच्या नावावर ३ शतके आणि ६ अर्धशतकांचा समावेश आहे.

या स्पर्धेतील त्याची सर्वोत्तम धावसंख्या ११७ धावा होती. या कामगिरीच्या जोरावर कोहली या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आणि विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत सचिनला मागे टाकले. २००३ च्या विश्वचषकात सचिनने ६७३ धावा केल्या होत्या. याशिवाय कोहलीने सचिन तेंडुलकरचा वनडेमध्ये ४९ शतकांचा विक्रम मागे टाकत या फॉरमॅटमध्ये ५० वे शतक झळकावले होते. न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात कोहलीने हा पराक्रम केला होता.

भारताने १ जून रोजी बांगलादेशविरुद्ध सराव सामना खेळला होता ज्यामध्ये कोहली खेळला नव्हता. सराव सामन्यात भारताने बांगलादेशचा ६० धावांनी पराभव केला होता. तसेच, भारतीय संघ ५ जूनला टी-२० विश्वचषकात आयर्लंडसोबत पहिला सामना खेळणार आहे. २००७ साली भारताने टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर टीम इंडियाला टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद जिंकता आलेले नाही. २०२२ मध्ये इंग्लंडने शेवटच्या वेळी टी-२० विश्वचषक जिंकला होता. आता कोहली टी-२० विश्वचषक खेळण्यासाठी अमेरिकेत आला आहे.

# उष्माघात, थकवा व पेटके यांत नेमका फरक काय?

## लक्षणे व उपाय जाणून घ्या

● दिल्लीसह अनेक राज्यांत उष्णतेच्या लाटेने कहर केला आहे. गावखेड्यांच्या तुलनेत शहरांमध्ये उष्णता दुप्पट वेगाने वाढतेय. अशा परिस्थितीत दुपारच्या वेळी लोकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. सततच्या वाढत्या तापमानामुळे आरोग्यालाही धोका निर्माण होत आहे. दिल्लीत उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे अनेकांना विविध आजारांचा सामना करावा लागतोय, उष्माघाताने तर अनेकांचे बळीही घेतले आहेत. अशातच उन्हामुळे जाणवणाऱ्या अनेक आजारांविषयी चर्चा केली जात आहे. उन्हाळ्यात बहुतांश लोक उष्माघात, उष्णतेमुळे जाणवणारा थकवा व स्नायूंमध्ये पेटके येणे अशा अनेक समस्यांचा सामना करीत आहेत. पण या आजारांविषयी अनेकांच्या मनात विविध प्रश्न निर्माण होत आहेत. हे आजार जरी तीव्र स्वरूपाच्या उष्णतेमुळे होत असले प्रत्येक आजाराच्या लक्षणांमध्ये काही फरक आहे; जो जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे.

याचविषयी नोएडामधील शारदा हॉस्पिटलचे एमडी (इंटर्नल मेडिसिन) डॉ. श्रेय श्रीवास्तव यांनी सविस्तर माहिती दिली आहे. उष्माघात, पेटके व थकवा यांतील फरक त्यांनी सोप्या भाषेत स्पष्ट केला



आहे.

उष्माघात, पेटके व थकवा यात नेमका फरक काय?

डॉ. श्रीवास्तव यांच्या म्हणण्यानुसार, जेव्हा दीर्घकाळ तीव्र उष्णतेमुळे शरीराचे तापमान ४० डिग्री फॅरेनहाइटपेक्षा जास्त वाढते तेव्हा उष्णतेमुळे थकवा येतो. यावेळी स्नायूंमध्ये पेटके येणे, निर्जलीकरण, पोटासंबंधित समस्या आणि इलेक्ट्रोलाइट्स असंतुलन यांसारखी लक्षणे जाणवतात. असे प्रामुख्याने शरीरातील द्रवपदार्थ कमी झाल्यामुळे होते. परिणामी शरीराचे कार्य बिघडते.

उष्णतेमुळे जाणवणाऱ्या थकव्याच्या तुलनेत उष्माघात अधिक गंभीर असतो; ज्यात त्वरित डॉक्टरी उपचार घेणे गरजेचे असते. त्यात रुग्णाच्या शरीराचे तापमान १४० डिग्री फॅरेनहाइटच्या वर वाढते; ज्यामुळे बेशुद्ध पडणे, चक्कर येणे, आळस येणे, निर्जलीकरण व लघवीला जळजळ होणे, अशी लक्षणे जाणवतात. अशा परिस्थितीत काही रुग्ण कोमातही जाऊ शकतात, असे डॉ. श्रीवास्तव यांनी सांगितले.

उष्माघात अनेकदा जीवघेणा ठरतो. अशा स्थितीत आपले शरीर द्रवपदार्थाची कमी झालेली पातळी स्थिर करण्याचा प्रयत्न करीत असते; पण त्यामुळे हृदयाच्या गतीमध्ये चढ-उतार होत राहतो. अनेकदा उष्माघातामुळे रुग्णाची स्थिती फार नाजूक होते.

डॉ. श्रीवास्तव यांनी पुढे स्पष्ट केले की, स्नायूंमध्ये पेटके येणे ही उष्णतेमुळे उदभवणारी एक जटिल समस्या आहे. यात शरीरातील स्नायूंमध्ये तीव्र पेटके येतात. थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येत असलेले मजूर, शाळकरी मुले, खेळाडू व वृद्धांमध्ये अशा प्रकारचा त्रास मोठ्या प्रमाणात होतो.

उपचार

३० पेक्षा जास्त बीएमआय असलेल्या लठ्ठ व्यक्ती, मधुमेही आणि ज्यांच्या शरीराचे तापमान आणि हृदयाचे ठोके अधिक वेगाने वाढतात अशा व्यक्ती, तसेच गर्भवती महिलांना उष्माघाताचा अधिक धोका असतो. त्यांना अनेकदा रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासू शकते. त्यासाठी त्यांनी नियमितपणे शरीरातील द्रव पदार्थांची पातळी भरून काढण्यासाठी IV द्रवपदार्थ घेतले पाहिजेत, असे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

उष्णतेमुळे जाणवणारा थकवा आणि पेटके यांनी ग्रस्त असलेल्या लोकांनी इलेक्ट्रोलाइट पदार्थांचे सेवन करावे. त्यात ते नारळाचे पाणी, ओरल रिहायड्रेशन सोल्युशन व केळी यांसारख्या पदार्थांचा समावेश करू शकतात. अशा आजारांमधून ठीक होण्यासाठी सहा ते आठ तास लागू शकतात. त्यामुळे विश्रांती आणि द्रवपदार्थाच्या सेवनाला प्राधान्य द्या, अशी शिफारस डॉ. श्रीवास्तव करतात.

इतकेच नव्हे, तर उन्हाळ्यात सैल, हलक्या रंगाचे कपडे वापरा. तसेच. त्वचेवर ब्रॉड-स्पेक्ट्रम एसपीएफ सनस्क्रीन वापरा, दुपारी १२ ते ३ या वेळेत थेट उन्हात जाणे टाळा, नेहमी पाण्याची बाटली बरोबर ठेवा आणि हायड्रेटेड राहा, असा सल्लाही डॉक्टरांनी दिला आहे.

# रवीना टंडनची भर रस्त्यात बाचाबाची



● अभिनेत्री रवीना टंडन सध्या चित्रपटसृष्टीपासून काहीशी लांब गेल्याचं चित्र निर्माण झालं आहे. मात्र, शनिवारी रात्री घडलेल्या एका प्रसंगामुळे रवीना टंडन चर्चेत आली आहे. मुंबईच्या वांद्रे परिसरातील रिझवी कॉलेजजवळ रवीना टंडनची भररस्त्यात काही स्थानिकांशी बाचाबाची झाल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये काही स्थानिकांनी रवीना टंडनला घेरल्याचं दिसून येत आहे. कार पार्किंगवरून हा वाद झाल्याचं सांगितलं जात आहे.

अभिनेत्री रवीना टंडनचा हा व्हिडीओ मोहसीन शेख नावाच्या एका व्यक्तीच्या इन्स्टाग्राम व ट्विटर अकाऊंटवरून शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये रवीना टंडन काही व्यक्तींशी वाद घालत असल्याचं दिसत आहे. तसेच, काही व्यक्तींनी तिच्यासोबत धक्काबुक्कीही केल्याचं दिसत आहे. यावेळी झालेल्या वादात रवीना टंडन समोरच्या व्यक्तीला "तुम्ही मला असं ढकलू शकत नाही", असं वारंवार सांगताना दिसत आहे. तसेच, समोरच्या व्यक्तीने पोलिसांना पाचारण करण्याचा इशारा देताच रवीना टंडनने मी पोलिसांना बोलावलं आहे, असं सांगितल्याचं व्हिडीओमध्ये दिसत आहे.

रिझवी कॉलेजजवळ कार्टर रोडवरचा हा व्हिडीओ असल्याचं फ्री प्रेस जर्नलनं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे. रवीना टंडनच्या कारचालकाचा कार पार्किंगवेळी काही स्थानिकांना धक्का लागल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यातून झालेल्या वादामध्ये नंतर रवीना टंडनही पडली आणि त्यातून तिचीही संबंधित स्थानिकांशी वादावादी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

रवीना टंडनच्या वडिलांचा मोठा सन्मान, मुंबईतील चौकाला दिलं रवी टंडन यांचं नाव, अभिनेत्री भावुक होत म्हणाली...

मारहाणीचा आरोप

दरम्यान, या प्रकरणी मोहम्मद नावाच्या एका व्यक्तीने रवीना टंडनने मारहाण केल्याचा धक्कादायक आरोप केला आहे. हा व्हिडीओ देखील व्हायरल होत असून यासंदर्भात पोलीस आपली तक्रार दाखल करून घेत नसल्याचा दावाही ही व्यक्ती व्हिडीओमध्ये करत आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०२२ : केनिची होरी - वयाच्या ८३ व्या वर्षी पॅसिफिक महासागर ओलांडून एकट्याने प्रवास करणारे सर्वात वयस्कर व्यक्ती ठरले आहेत. २०२२ : भारतातील उत्तर प्रदेशातील हापूर येथे केमिकल प्लांटमध्ये स्फोट होऊन त्यात ८ लोकांचे निधन तर १५ लोक जखमी.

२०२२ : कलश गुप्ता - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) दिल्लीतील संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विद्यार्थी कलश गुप्ता यांनी सर्वात मोठी कोडिंग स्पर्धा TCS CodeVita जिंकली.

२०१० : स्पेसएक्स फाल्कन ९ रॉकेट पहिले उड्डाण.

२००१ : नेपाळचा शेवटचा राजा ग्यानेंद्र राज्यपदावर.

१९९७ : नासाचे मार्स पाथफाइंडर प्रोब मंगळावर उतरले.

**जन्म**

१९९०: जेत्सुनपेमा वांग्चुक भूतानची राणी

१९७५ : अँजेलिना जोली अमेरिकन अभिनेत्री

१९७४: जॅकब सहाय्या कुमार अरुनी भारतीय शेफ (निधन: ४ नोव्हेंबर २०१२ )

१९५९ : अनिल अंबानी भारतीय उद्योगपती आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे अध्यक्ष

१९४७: अशोक सराफ मराठी विनोदी अभिनेते

१९४६: एस. पी. बालसुब्रह्मण्यम चित्रपट पार्श्वगायक पद्म भूषण, पद्मश्री (निधन: २५ सप्टेंबर २०२०)

१९३६: नूतन भारतीय अभिनेत्री पद्मश्री (निधन : २१ फेब्रुवारी १९९१)

१९१६: रॉबर्ट एफ. फर्चगॉट अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (निधन: १९ मे २००९)

१९१५ : मादीबो केएटा - माली देशाचे पहिले अध्यक्ष (निधन : १६ मे १९७७)

**निधन**

२०२२: प्रयार गोपालकृष्णन भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (जन्म: २० सप्टेंबर १९४९)

२०२०: लेखकबासु चटर्जी - भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा (जन्म: १० जानेवारी १९३०)

२००२ : फर्नांडो बेलाउंडे टेरी पेरू देशाचे ८५ वे राष्ट्रपती (जन्म: ७ ऑक्टोबर १९१२)

१९९८ : डॉ. अश्विन दासगुप्ता इतिहासतज्ज्ञ

१९६२ : चार्ल्स विल्यम बीब अमेरिकन निसर्गतज्ज्ञ


१९४७: पंडित धर्मानंद कोसंबी - भारतीय बौद्ध धर्माचे अभ्यासक (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)

# लोकसभा निवडणुकीच्या निकालावर आनंद इंगळेंचं भाष्य

● लोकसभेच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्याचं मतदान पार पडलं. त्यानंतर विविध संस्थांचे एक्झिट पोल जाहीर झाले असून त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात 'एनडीए'ला केंद्रात स्पष्ट बहुमत मिळताना दिसत आहे. काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला १५० ते १७०च्या आसपास जागा मिळत आहेत. मात्र, सगळ्यांचं लक्ष ४ जून रोजी होणाऱ्या निकालाकडे लागलं आहे. यातच लोकसभेच्या संभाव्य निकालावर अभिनेते आनंद इंगळे यांनी भाष्य केलं आहे.

'तारांगण' या एंटरटेनमेंट युट्यूब चॅनलशी संवाद साधताना आनंद इंगळे यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालाबाबत आपलं मत मांडलं. त्यांना विचारलं गेलं होतं की, लोकसभा निवडणुकीच्या निकालाबाबत तुमचा अंदाज काय आहे? यावर आनंद इंगळे म्हणाले, "यावेळेला अंदाज लावणं खूप अवघड आहे आणि मीही अत्यंत सामान्य जनतेने प्रमाणे म्हणजेच गरीब किंवा अनभिज्ञ हे मी फक्त पैशाच्या अर्थाने म्हणतं नाहीये वेगळ्या अर्थाने म्हणतोय. आम्हाला माहितीच नाही कसं होईल? असा भाभडा विचार करणाऱ्या लोकांप्रमाणे झालं आहे."

"आज आपण महाराष्ट्राच्या राजकारणात काय होईल याचा अंदाज लावू शकतोय का? मी राजकीयदृष्ट्या निरक्षर असणं असं अजिबात म्हणत नाहीये. त्याच्यासाठी सजग असलं पाहिजे. मी माझं मत दिलंच की, फक्त मला खरोखरचं या वेळेला अवघड असल्यासारखं वाटतंय. विचारधारेमधला फरक असू शकतो. तुमची एक विचारधारा, माझी एक विचारधारा. मी यावेळेस या विचारधारेला मत दिलं होतं. पण दुसरी विचारधारा निवडून आली. जास्त लोकांना ती विचारधारा निवडून यावी असं



वाटतं होतं आणि त्यांनी तो राज्यकारभार केला इतकं सोप होतं. पण आता म्हणजे माझी विचारधारा आहे आणि ज्या विचारधारेला मी मत देतो आहे, त्याच्यातलं कोणीतरी दुसरीकडे जातात, पुन्हा परत येतात. काहीच कळंना झालंय. जनतेसाठी हा गोंधळ झालाय. आपल्याकडे गोंधळाचं वातावरण आहे. जे राजकीय विश्लेषक आहेत, त्यांनाही वाटतंय की यावेळेला अवघड आहे. तर आपल्यासारख्या सामान्य माणसांना काय वेगळं वाटणार?" असं स्पष्ट मत आनंद इंगळेंनी मांडलं.

पुढे त्यांना भूमिका बदलणाऱ्या राजकारण्यांविषयी विचारण्यात आलं. त्यावर ते म्हणाले, "मला याचा राग येण्यापेक्षा असहाय्य होतं. राग येऊन काय होणार आहे. असहाय्य होतं आणि वाटतं, बाबांनो हे कशासाठी चाललं आहे? आणि खरोखर मला हे मनापासून वाटतं की, आम्ही काय मुर्ख आहोत का? इतकंपण नका ना करू. एका अख्ख्याच्या अख्खा प्रचंड मोठा वर्ग एका विचारधारेच्या मागे असताना त्याच्या विरुद्ध विचारधारेच्या पक्षाबरोबर हातमिळवणी करता.

# विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात अमेरिकेने रचला इतिहास

● आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. पहिला सामना यजमान अमेरिका आणि कॅनडा यांच्यात खेळला गेला. या सामन्यात अमेरिकेने ७ विकेट्सनी कॅनडावर मात करत ऐतिहासिक विजय नोंदवला. या सामन्यात अमेरिकेने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात मोठे धावांचे आव्हान अवघ्या १७.४ षटकात पूर्ण केले. टी-२० विश्वचषकात अमेरिकेचा हा पहिला विजय आहे. हा ऐतिहासिक विजय चाहते विसरू शकणार नाहीत. या सामन्यात स्फोटक फलंदाजीचे प्रदर्शन करणारा ॲरॉन जोन्स अमेरिकेच्या विजयाचा हिरो ठरला.

कॅनडातील डॅलस येथील ग्रँड प्रेरी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात अमेरिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो पूर्णपणे त्यांच्या बाजूने गेला. कॅनडाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ गडी गमावून १९४ धावा केल्या. नवनीत धालीवालने संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळली. त्याने ४४ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६१ धावा केल्या. त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या अमेरिकेने १७.४ षटकांत विजय नोंदवला. अमेरिकेच्या फलंदाजांसमोर कॅनडाचे गोलंदाज पूर्णपणे असहाय्य दिसत होते.ॲरॉन जोन्सने अमेरिकेसाठी सर्वात मोठी खेळी खेळली, त्याने ४० चेंडूत ४ चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने ९४* धावा केल्या. याशिवाय अँड्रिज गसने ४६ चेंडूंत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ६५ धावा केल्या.

अमेरिकेचा कॅनडावर एकतर्फी विजय –

१९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना



अमेरिकेची सुरुवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर स्टीव्हन टेलरच्या रूपाने संघाने पहिली विकेट गमावली, जो खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर कर्णधार मोनांक पटेल आणि अँड्रिज गस यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४२ धावांची (२७ चेंडू) भागीदारी केली. ही भागीदारी १८व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर कर्णधार पटेलच्या विकेटने संपुष्टात आली. मोनांकने १६ चेंडूत २ चौकारांच्या मदतीने १६ धावांची खेळी साकारली.

यानंतर अँड्रिज गूस आणि ॲरॉन जोन्स यांनी तिसऱ्या विकेटसाठी १३१ धावांची (५८ चेंडू) जलद भागीदारी केली. या भागीदारीमुळे स्पर्धा अमेरिकेच्या बाजूने गेली. या भागीदारीनंतर हा सामना अमेरिकेसाठी एकतर्फी ठरली. ही शानदार भागीदारी १६व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर अँड्रिज गसच्या विकेटने संपुष्टात आली. अँड्रिजने ४६ चेंडूंत ७ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६५ धावांची खेळी केली. यानंतर कोरी अँडरसन आणि ॲरॉन जोन्स यांनी चौथ्या विकेटसाठी २४ (१२ चेंडू) धावांची नाबाद भागीदारी करून अमेरिकेला विजय मिळवून दिला. जोन्सने नाबाद ९४ धावा केल्या, तर अँडरसन ५ चेंडूत धावा केल्यानंतर नाबाद राहिला.

## राशि भविष्य

**मेष** – आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका, विशेषकरून मद्यापान टाळा. रिअल इस्टेट आणि आर्थिक व्यवहारांसाठी चांगला दिवस. एखाद्या जुन्या मित्राच्या फोन मुळे सायंकाळ स्मरणरंजनात व्यतीत होईल. अनपेक्षित प्रियाराधन करण्याकडे कल राहील.

**सिंह** – परिस्थितीवर तुमचे नियंत्रण आले की तुमची चिंता नाहिशी होईल.साबणाच्या फुग्याला स्पर्श करताच तो जसा फुटून जातो तसेच हे असल्याचे तुमच्या लक्षात येईल तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे.

**धनु** – चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आर्थिक पक्ष मजबूत होण्याची पूर्ण शक्यता आहे. जर तुम्ही कुठल्या व्यक्तीला पैसा उधार दिला आहे तर, आज तो तुम्हाला तो पैसा परत मिळण्याची शक्यता आहे. घरासभोवतालचे किरकोळ बदल घराकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतील.

**वृषभ** – मित्रांचा आधार लाभेल आणि ते तुम्हाला आनंदी ठेवतील. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल. नातेवाईकांच्या घरी जाऊन एखाद-दोन दिवस घालवलेत तर दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून थोडा आराम, विश्रांती मिळेल. सगळयासाठी प्रेम हाच पर्याय आहे, याची आज तुम्हाला जाणीव होईल.

**कन्या** – छोट्या मोठ्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देऊ नका. या राशीतील जे लोक परदेशात व्यापार करतात त्यांना आज चांगला धन लाभ होऊ शकतो. कुटुंबातील लोकांमध्ये पैश्याला घेऊन आज वाद होऊ शकतात. पैश्याच्या बाबतीत तुम्हाला कुटुंबातील सर्व लोकांसोबत स्पष्ट होण्याचा सल्ला दिला जातो

**मकर** – तुमचे आवडते छंद जोपासण्यासाठी किंवा तुमच्या आवडीच्या गोष्टींचा आनंद लुटण्यासाठी तुम्ही वेळ खर्च करायला हवा. इच्छा आशीर्वाद म्हणून पूर्ण होतील आणि उत्तम नशिब फळफळेल - आणि पूर्वीच्या दिवसांमध्ये केलेली मेहनत फळाला येईल. दिवसाच्या उत्तरार्धात होणारी एखाद्या जुन्या मित्राची भेट उल्हसित करेल.

**मिथुन** – मौजमजा करण्यासाठी बाहेरगावी जाऊन आनंद लुटाल, मजा कराल. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबाच्या आघाडीवर काही त्रासदायक प्रश्न निर्माण होतील. कौटुंबिक जबाबदा-यांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे कुटुंबाच्या रागाला आमंत्रण देण्यासारखे आहे.

**तूळ** – ज्येष्ठांनी त्यांच्या तब्येतीला जपून राहण्याची गरज आहे. आज तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसत आहे यामुळे तुम्हाला बराच आनंद होईल. संपूर्ण कुटुंबासाठी समृद्धीचे ठरतील असे प्रकल्प तुम्ही हात घ्यायला हवेत. आपल्या प्रिय व्यक्तीचे अस्थिर अनियंत्रित वागणे तुमचा मूड खराब करू शकते.

**कुंभ** – तुमच्यातील उच्च आत्मविश्वास आज चांगल्या कामासाठी वापरा. धावपळीचा दिवस असला तरी तुमची ऊर्जा टिकून राहील. ही गोष्ट लक्षात घ्या की, दुःखाच्या प्रसंगात तुमचे संचित धनच तुमच्या कामी येईल म्हणून, आजच्या दिवशी धन संचय करण्याचा विचार बनवा.

**कर्क** – आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. जर तुम्ही विद्यार्थी आहेत आणि परदेशात जाऊन शिक्षण इच्छा आहे तर, घरातील आर्थिक स्थिती तुमच्या डोक्यावर भार असेल. नवजात बालकाच्या आरोग्याविषयी काही प्रश्न उद्भवतील. तुमच्या प्रिय व्यक्तीच्या भावना आज समजून घ्या.

**वृश्चिक** – चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तसे तर आपला पैसा दुसऱ्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, आज तुम्ही कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक दिवस.

**मीन** – मुलांमुळे आजची संध्याकाळ प्रसन्न राहील. रटाळ कंटाळवाण्या, त्रासदायक दिवसाचा निरोप घेण्यासाठी, रात्रीच्या जेवणाचा मस्तपैकी प्लॅन करा. मुलांच्या सहवासात तुम्ही आणखीन उल्हसित व्हाल. आजच्या दिवशी तुम्हाला आपल्या त्या मित्रांपासून सावध राहायचे आहे जे तुमच्याकडून उधार मागतात आणि नंतर परत करत नाही.

# झाडाणी परिसर जमीन खरेदी बाबत ११ जून रोजी सुनावणी

● सातारा - सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात अतिदुर्ग व मागास भागातील जमीन खरेदी केल्याप्रकरणी गुजरात राज्याचे जी.एस.टी. विभागाचे आयुक्त चंद्रकांत वळवी यांच्यासह तिघांवर कमाल जमीन धारण कायद्याची पायमल्ली केल्याचा आरोप करून नोटिसा काढण्यात आलेली आहे. या नोटीसला वकिलामार्फत पुढील आठवड्यात मंगळवार दिनांक ११ जून रोजी सकाळी ११ वाजता म्हणणे मांडण्यात येणार आहे. याकडे आता सर्वांचेच लक्ष लागलेले आहे.



सातारा जिल्ह्यातील अनेक बेकायदेशीर घटनेचा उलगडा होण्यासाठी माहितीच्या अधिकाऱ्याचा चांगल्या पद्धतीने वापर होत आहे. सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी या कायद्याचा वापर करून सुमारे वीस वर्षांपूर्वी झालेल्या जमीन खरेदीच्या व्यवहाराची पाळीमुळे खणून काढलेली आहे. अशी माहिती पुढे येत आहे. यासाठी त्यांना प्रसार माध्यमाची मोठी ताकद मिळालेली आहे.

मुळातच साताराचे अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी विलंबाने का होईना. पण, संभाजीतांच्या नावे तातडीने नोटीस पाठवून आपले कर्तव्य पार पाडलेले आहे. आता या अधिकृत नोटीस प्राप्त झाल्यानंतर जी.एस.टी. आयुक्त चंद्रकांत वळवी वरिष्ठ अधिकारी अनिल वसावे व एका सेवानिवृत्त आईएएस वरिष्ठ अधिकाऱ्याचे पुत्र पियुष बोगीरवार हे जमीन खरेदीदार काय म्हणणे म्हणतात याकडे आता सर्व महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे.

या नोटीस बाबत ही जमीन खरेदी करताना किती दर दिले? पैसे कुठून आणले? याचा उल्लेख नसला तरी महाराष्ट्र शेतजमीन अधिनियम १९६१ नुसार निश्चित केलेल्या जमीन धारणेच्या कमाल मर्यादा पेक्षा जास्त जमीन धारण केल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. या अहवालानुसार पुढची स्टेप म्हणून ही नोटीस बजावण्यात आलेली आहे. या नोटिशीला उत्तर देण्याची संधी मिळावी यासाठी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक ११ जून रोजी सकाळी ११ वाजता संबंधित तिघांना म्हणणं मांडण्यासाठी बोलवण्यात आलेले आहे. या म्हणण्यामध्ये काही तथ्य न आढळल्यास सदरची सर्व जमीन सरकारी जमा करण्यात येईल. असेही सूचित केलेले आहे.

मुळातच या झाडाणी गावचा परिसर पाहिला तर हा परिसर अतिदुर्गम व मागास असून या ठिकाणी साधे रस्ते नसल्यामुळे दिवसा हिंस्र प्राण्यांच्या भीतीने पायपीट करावी लागते. परंतु, या ठिकाणी आठ खोल्याचे रिसॉर्ट उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य घेऊन गेलेले आहेत. याचाच अर्थ या ठिकाणी रस्ता सुद्धा तयार झालेला आहे. तसेच सदर जागेचे भाव पाहिले तर कागदपत्र तयार करण्यासाठी जेवढा प्रवास खर्च होतो. अशा पैशात काही जमीन खरेदी केले असल्याची चर्चा आहे.

गुजरात राज्याचे जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी यांच्यासह डझनभर लोकांनी जावळी -महाबळेश्वर तालुक्यातील दुर्गम परिसरातील जमिनी खरेदी करून एक प्रकारे आपली स्थावर मालमत्ता वाढवलेली आहे .त्याची नोंद सुद्धा झालेली आहे.

आता वीस वर्षांनी या जमिनीच्या व्यवहाराचे पंचनामे पुढे आले आहेत . गतिमान सरकारच्या गती पाहून अनेकांची मती गुंग झालेली आहे. अगदी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडेही लेखी तक्रार करण्यात आलेली आहे. या सर्व गोष्टींचा चर्चा होताना दिसते मात्र या जमिनी खरेदी विक्री बाबत ज्या दलालांनी व शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केलेले आहे. त्यांच्या बाबतीत मात्र मौन पाळले जात आहे .एवढेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांच्या दरेगावच्या दौऱ्यात काही दलालांचे चेहरे सुद्धा त्यांच्या अवतीभवती वावरत होते. हे सुद्धा स्पष्ट झालेले आहे.

सातारा जिल्ह्यातील दुर्गम व अतीदुर्ग मागास भागात फक्त जमीन बघून भूमिपुत्रांचे पोट भरत नाही. तर चांगले ग्राहक मिळाले म्हणून काहींनी या जमिनी विकून शहराकडे धाव घेतलेली आहे. या भागात नागरिक सुविधा देणे . इतकी इथे लोकसंख्या नाही. मताचा विचार केला तर या ठिकाणी कुठलेही गट नाही. राजकीय पक्ष पोहोचू शकत नाही. अशावेळी जमीन खरेदी प्रकरणामुळे आता अनेकांचे पाय या झाडाणी गावात लागलेले आहेत. हे सुद्धा स्पष्ट झाले आहे.

■ साताराचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केलेल्या ठोस कारवाईबाबत सर्वत्र समाधान पसरले आहे . यापूर्वी माजी विभागीय आयुक्तांनी जांभे येथील जमिनी खरेदी व्यवहाराबाबत केलेल्या कामगिरी बाबत तात्कालीन जिल्हाधिकारी एम. रामास्वामी यांनी नोटीस काढून रद्द केली होती. याची मात्र अनेकांना आठवण झालेले आहे. दरम्यान, मंगळवार दिनांक ११ जून रोजी श्री साने गुरुजी स्मृतिदिनी सातारा जिल्हा धिकारी कार्यालयात या नोटीसला म्हणणं मांडण्याची संधी श्री चंद्रकांत वळवी, अनिल वसावे व पियुष बोगीरवार यांना देण्यात आलेली आहे. त्यांचे म्हणणे मांडल्यानंतर याबाबत हस्ते पर हस्ते नव्हे तर स्वतः सातारा जिल्हाधिकारी यांनी माहिती द्यावी .अशी मागणी पुढे आलेली आहे. या भागात मोठ्या प्रमाणे अतिवृष्टी होत असल्याने पुढील कारवाईला विलंब असे काही ग्रामस्थांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

सदर नोटीसला वकिलामार्फत उत्तर दिले जाईल.शासनाच्या कायद्यानुसार कारवाई होईल. कारण तसे आदेश मुख्यमंत्री पालकमंत्री व आमदार मकरंद पाटील यांनी सुद्धा मागणी करून जागरूकता दाखवलेले आहे. कायद्यामध्ये पळवाट म्हणजे दंडात्मक कारवाई करून काही अतिक्रमण हे कायम करण्यात येते. याचाच फायदा घेऊन अनेकांनी अतिक्रमण करून आता दंडात्मक रक्कम भरून सर्व जमीन च्या मालकी व हक्क प्रस्थापित करून बँकेचे कर्ज काढून व्यवसाय सुरू केलेले आहे. स्वतःच्या नावावर या संपत्तीची नोंद सुद्धा करण्यात आलेली आहे. हा भाग वेगळा असला तरी सध्या झाडाणी परिसरातील ६४० एकर पडीक जमीन खरेदी व्यवहाराने गाव विकत घेतल्याची अफवा पसरवली जात आहे. यामध्ये काही प्रमाणात तथ्य नसले तरी ज्या जमिनी घेतलेले आहेत. त्याची नोंद करताना ही बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या लक्षात आली नाही का ? त्यांचे लक्ष विचलित करण्याचा उद्योग संबंधित जमीन खरेदी करणाऱ्यांनी केला आहे का? याचीही तपासणी होणे गरजेचे आहे.

## जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, बांद्रा यांनी अधिकाऱ्यांना दिली तंबाखू मुक्तीची शपथ !




● मुंबई : समाजाचे घटक म्हणून आपण सर्वांनीच व्यसनासारख्या समस्थेकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे वाढती व्यसनाधीनता समाजासाठी गंभीर आजार आहे. असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेन्द्र क्षीरसागर यांनी केले जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई उपनगर बांद्रा येथे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य , समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना तंबाखूमुक्तीची शपथ दिली.व तंबाखू उद्योजकाच्या हस्तक्षेपापासून मुलांचे संरक्षण या संकल्पनेचे उद्घाटन केले. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.ज्यांनी २०११ साठी व्यसनमुक्तीचे धोरण अमलात आणले . महाराष्ट्र सरकारने या निमित्ताने व्यसनमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल उचलावे असे आवाहन उपजिल्हाधिकारी सतिश बागल यांनी केले. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवनाने दरवर्षी भारतात लाखो लोकांचा मृत्यू होतो. कितीतरी मुले अनाथ होतात. कर्करोगाच्या आजाराने संपूर्ण कुटुंब उध्वस्त होते. रुग्णालयामध्ये लाखो रुपये खर्च होतात.यावेळी नशाबंदी मंडळाचे कमेटी मेंबर बॉस्को डिसुजा हजर होते.अशी माहिती नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई उपनगर जिल्हा संघटक दिशा कळंबे यांनी दिली.

# अमूलपाठोपाठ मदर डेअरीनेही दिला महागाईचा झटका; दुधाच्या दरात केली वाढ

● अमूल दुधाच्या दरात वाढ झाल्यानंतर मदर डेअरीनेही आता ३ जूनपासून सर्व प्रकारच्या दुधाच्या दरात २ रुपयांनी वाढ केली आहे. ही वाढ आजपासून लागू झाल्याचं मदर डेअरीने म्हटलं आहे.

मदर डेअरीने सोमवारी दुधाच्या सुधारित दराची यादी जाहीर केली. यादीनुसार आता लोकांना मदर डेअरीचं बल्क वेंडेड दूध ५२ ऐवजी ५४ रुपये, टोन्ड दूध ५४ ऐवजी ५६ रुपये, गायीचे दूध ५६ ऐवजी ५८ रुपये, फुल क्रीम दुधासाठी ६६ ऐवजी ६८ रुपये मोजावे लागणार आहेत. म्हशीच्या दुधाला ७० ऐवजी ७२ रुपये आणि डबल टोन्ड दुधासाठी ४८ ऐवजी ५० रुपये मोजावे लागणार आहेत.

दुधाचे भाव का वाढले?

दुधाचे दर वाढण्याचं कारण म्हणजे त्यासाठी येणारा खर्च जास्त असल्याचं दुग्ध व्यापाऱ्यांचं म्हणणं आहे. कडाक्याच्या उन्हात दूध उत्पादनाचा खर्च वाढला आहे. गाई-म्हशींनी दूध देणे बंद केलं किंवा कमी केलं आहे. या कारणांमुळे कंपन्यांनी दुधाचे दर




वाढवले आहेत.

गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनने सोमवारपासून दुधाच्या दरात दोन रुपयांनी वाढ केली आहे. युनियनने म्हटले आहे की, "एकूण कामकाजाचा खर्च आणि दुधाच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे ही दरवाढ करण्यात आली आहे. आमच्या सदस्य संघटनांनीही गेल्या वर्षभरात शेतकऱ्यांच्या किमतीत सुमारे ६-८ टक्क्यांनी वाढ केली आहे."

अमूलचे दूध २ रुपयांनी महागले

देशातील सर्वात मोठा दूध उत्पादन संघ अमूलने प्रति लीटरमागे दोन रुपयांची वाढ जाहीर केली आहे. गुजरात मिल्क मार्केटिंग फेडरेशन (GCMMF) उद्यापासून म्हणजेच ३ जूनपासून ही दरवाढ लागू केली असून याचा परिणाम सामान्यांच्या खिशावर होणार आहे. या दरवाढीमध्ये अमूल गोल्ड, अमूल ताजा आणि अमूल शक्ती आदी उत्पादने आहेत. अमूल ताज नाना पाउच सोडून सर्व दुधाचे दर वाढविण्यात आले आहेत.

नव्या दरवाढीनुसार अमूल गोल्डच्या अर्धा लीटर दुधाची किंमत ३२ रुपयांवरून ३३ रुपये झाली आहे. अमूल ताजाची किंमत २६ रुपयांवरून २७ रुपये झाली आहे. अमूल शक्तीची किंमत २९ रुपयांवरून ३० रुपये झाली आहे.

# मुंबई-बंगळुरू महामार्गावर रस्ता ओलांडताना वाहनाने उडवले, तरुणाचा मृत्यू

● पिंपरी : रस्ता ओलांडत असलेल्या तरुणाला भरधाव वाहनाने धडक दिली. यात गंभीर जखमी झाल्याने तरुणाचा मृत्यू झाला. मुंबई-बंगळुरू महामार्गावरील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलासमोरील बस थांब्याजवळ शुक्रवारी (दि. ३१) रात्री दहाच्या सुमारास ही घटना घडली.

मो. एहेतसाम अन्सारी फखरुद्दीन अन्सारी (वय २७) असे या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. मोहम्मद एहसान अन्सारी




फखरल हसन (३२, रा. मंगळवार पेठ, जुना बाजार, पुणे) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली. तुकाराम विठ्ठल वाशिवले (२७, रा. वाशिवली, ता. वाई, जि. सातारा) याच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी एहसान व त्यांचा भाऊ मो. एहेतसाम, तसेच त्यांच्या गावातील मोहम्मद इरफान व मोहम्मद तन्वीर हे नेहमीप्रमाणे केटरिंगचे काम असल्याने बालेवाडीतील क्रीडा संकुल येथे आले होते. त्यांचे काम संपवून ते घरी जाण्यासाठी निघाले असता, एहेतसाम हे गाडी पकडण्यासाठी रस्त्याच्या पलीकडील बस थांब्याकडे पायी जात होते. दरम्यान, रस्ता ओलांडत असताना, संशयिताच्या भरधाव वाहनाने एहेतसाम यांना जोरात धडक दिली. यामध्ये गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

# Two LeT militants trapped - includes one who evaded security forces for years



● Srinagar - Two Lashkar-e-Toiba (LeT) militants, including one that has long been on the radar of security forces, were trapped Monday amid a gunfight between militants and a joint team of security forces in south Kashmir's Pulwama, sources said.

On Monday morning, a joint team comprising personnel from the Jammu and Kashmir Police, the Army, and paramilitary forces cordoned off Pulwama's Nehama village after specific inputs about the pres//ence of militants in the village.

As the joint team zeroed in on its target, the hiding militants opened fire and tried to break the security cordon, officials said, adding that the joint team then fired back, leading to a gunfight.

# Uddhav Sena's Anil Parab to file nomination for Mumbai Graduate Constituency polls today

● Mumbai - Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray) legislator Anil Parab will file his nomination papers on Monday from the Mumbai Graduate Constituency in the Maharashtra Legislative Council.

Parab will file his nomination papers with the Konkan divisional commissioner at noon on Monday. In a show of strength by the Shiv Sena (Uddhav



Balasaheb Thackeray), Yuva Sena chief Aaditya Thackeray, the party's Lok Sabha candidates from Mumbai Arvind Sawant, Anil Desai, Amol Kirtikar, Mumbai Congress president Varsha Gaikwad, Congress Lok Sabha candidate Bhushan Patil, and other prominent leaders, MPs, and MLAs of the Mahavikas Aghadi will be present when Parab would his nomination papers. Around 3,000 Shiv Sainiks, Yuva Sainiks, and graduate voters will also be present for the nomination.

Last week, Shiv Sena chief Uddhav Thackeray announced the name of Anil Parab as the party's candidate from the Mumbai Graduate Constituency. Parab, who has been a Shiv Sena MLC in 2004, 2012, and 2018, is contesting the election from the Mumbai Graduate Constituency for the first time. Parab said, "The Mumbai Graduate Constituency has been with the Shiv Sena for 30 years. The Shiv Sena has taken the lead in voter registration and campaigning. This time too, my victory as a candidate of the Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray) party from the Mumbai Graduate Constituency is certain with a record number of votes".

# बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच ( खरवली विभाग ) कार्यकारिणी च्या माध्यमातून दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन !

● माणगाव - बौद्धजन पंचायत समिती तालुका माणगाव अंतर्गत सामाजिक क्षेत्रात अत्यंत पारदर्शी आणि उल्लेखनीय कारभार करणार्या विभाग शाखांपैकी एक आणि सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच खरवली विभाग सात गाव ग्रुप च्या विद्यमान कार्यकारिणी पदाधिकारी मंडळाने अर्थात या शाखेचे विद्यमान अध्यक्ष विवेक जाधव, उपाध्यक्ष राजेश कासारे, सचिव अमोल मोहिते, दुय्यम सचिव नंदू कांबळे, खजिनदार रोहित सकपाळ, संदेश वाहक संदेश



कासारे इत्यादी पदाधिकार्यांनी खरवली विभागातील खरवली, उमरोळी, सुरव, बोर्ले, पेण, बोरघर आणि आमडोशी बौद्ध वाडीतील इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थी खरवली- दिक्षा विनोद जाधव, उमरोळी - तन्वी संतोष जाधव, सुरव- सुकृती राजेश जाधव, बोरघर- अनुष्का आकाराम गायकवाड, बोर्ले- प्रज्वल दयाराम मोहिते, पियुष प्रशांत मोहिते, रोहन विलास मोहिते, यश नरेश मोरे, मृणाली मारुती मोहिते,योगिता अशोक नाक्ते, पेण / तळे - पूर्वी नितीन कासारे, ध्रुव नितीन कासारे, आदित्य किशन गायकवाड, यश मंगेश कासारे, आणि त्यांच्या पालकांचे त्यांच्या घरी जाऊन त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच खरवली विभाग शाखेच्या विद्यमान कार्यकारिणींनी आपल्या नैतिक जबाबदारीची जाणीव ठेवून हाती घेतलेला हा नाविन्यपूर्ण उपक्रम समाजातील नवतरुण विद्यार्थ्यांना आणि त्यांना घडविणार्या पालकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आणि प्रोत्साहन देणारा आहे.

# Over 7 years after murder of software engineer Antara Das, family asks if she will get justice

● Pune - The family of Antara Das, a 23-year-old software engineer who was murdered more than seven years ago near her office in Pune, is still waiting for justice.

An employee of Capgemini, Das was attacked by an unidentified person multiple times with a sharp weapon while she was walking through the Canbay Square near her office in Talawade at around 8.30 pm on December 23, 2016.

Satyendra Sinha, who was passing by, saw Das lying in a pool of blood and rushed her to a private hospital, where she died. Later, Sinha lodged a complaint of murder at the Dehu Road Police Station, which was then under the Pune rural police jurisdiction, and is now a part of Pimpri Chinchwad police. On December 28,



police arrested an IT professional Santoshkumar Gupta (then 24 years old) from Bengaluru, suspecting his role in Das's murder. He was booked under sections 302 (murder), 120 (b), and 23 of the Indian Penal Code (IPC).

The police said a resident of West Bengal, Das went to Bengaluru in 2015 for advanced training in software engineering, where she was introduced to Gupta. She later came to Pune where she joined Capgemini in April 2016 and started living as a paying guest in the Nigdi Pradhikaran area of the city.

# कोकण पदवीधर मतदार संघासाठी महायुतीत तिहेरी लढत

● रायगड प्रतिनिधी :

सात टप्प्यात पार पडलेल्या लोकसभा निवडणूक 2024 चा निकाल मंगळवारी (4 जून) जाहीर होणार आहे. मात्र लोकसभा निवडणूक सुरू असतानाच निवडणूक आयोगाने विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या चार जागांवर निवडणुका घोषित केल्या होत्या. आमदारांचा कार्यकाळ संपत असल्याने निवडणूक आयोगाने निवडणूक आयोगाने मुंबई, नाशिक आणि कोकण विभागात शिक्षक, पदवीधर मतदार संघांची निवडणूक जाहीर केली आहे. अशातच आता कोकण पदवीधर मतदार संघात



भाजपा शिवसेना शिंदे गट आणि मनसे यांच्यात तिहेरी लढत होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

गेल्या काही वर्षांपासून कोणतीच निवडणूक न लढविणाऱ्या मनसेने यंदा महायुतीला लोकसभेसाठी पाठिंबा देताना विधानसभेला जागा लढविण्याची घोषणा केली होती. यानंतर आता मनसेने विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी आपला उमेदवार जाहीर केला आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अभिजित पानसे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

■ कोकण विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक 26 जून रोजी होत आहे. यासाठी शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसनंतर भाजपा आणि शिवसेनेने आपले उमेदवारी जाहीर केले आहेत. भाजपाने निरंजन डावखरे यांना कोकण विभाग पदवीधरमधून, किरण शेलार यांना मुंबई पदवीधर मतदारसंघातून आणि शिवनाथ दराडेंना मुंबई शिक्षक मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. तर शिवसेना शिंदे गटाकडून कोकण पदवीधर मतदार संघातातून संजय मोरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता महायुतीत एकत्र असलेले पक्ष विधान परिषदेच्या निवडणुकीत एकत्र लढताना दिसणार आहेत.

अभिजीत पानसेंना उमेदवारी घोषित झाल्यामुळे भाजपा नेते निरंजन डावखरेंचे तिकीट कापले गेल्याची चर्चा रंगली होती. मात्र भाजपाने कोकण विभाग पदवीधरमधून निरंजन डावखरे यांना उमेदवारी दिली, तर मुंबई पदवीधर मतदारसंघातून किरण शेलार यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे भाजपा आणि मनसे यांच्यात लढत होईल, असे वाटत असतानाच शिवसेना शिंदे गटानेही संजय मोरे यांना उमेदवारी घोषित करत केली. त्यामुळे आता कोकण पदवीधर मतदार संघात महायुतीत तिहेरी लढत होताना दिसत आहे.

## राज्यात यंदा ९९ टक्के पाऊस



● मुंबई प्रतिनिधी :

उन्हाच्या कडाक्यामुळे विदर्भ, मराठवाड्यात नागरिकांचे हाल होत असून, बहुतांश शहरांतील कमाल तापमान चाळिशीपार नोंदवले जात आहे. काही भागांत तर तापमान 45 अंशांवर गेले आहे. त्यामुळे चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वर्धा या ठिकाणी नागरिक हैराण झाले आहेत. परंतु, आता एक आनंदाची बातमी समोर आली आहे. लवकरच राज्यात मॉन्सून दाखल होणार आहे. तसंच, यंदा राज्यात 99 टक्के पाऊस होण्याचा अंदाजही वर्तवला जात आहे.

राज्यात जून ते सप्टेंबर 2024 दरम्यान सरासरीच्या 99 टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, नाशिक, चंद्रपूर या भागांत 100 टक्के आणि उर्वरित भागांत साधारणपणे 95 ते 98 टक्के पावसाचा अंदाज आहे. तर पुण्यात 100 टक्के आणि पावसाचे प्रमाण असेल, असा अंदाज ज्येष्ठ कृषी हवामानतज्ज्ञ डॉक्टर रामचंद्र साबळे यांनी व्यक्त केला. जून ते जुलै महिन्यात पावसाचा खंड पडेल आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस होईल, असंही त्यांनी सांगितलं.

दोन महिने मुसळधार पावसाचा अंदाज

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, प्रशांत महासागरावरील एल निनोचा प्रभाव आता हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे ला निना सुरू झाल्यावर देशात जोरदार मान्सूनची हजेरी पाहायला मिळेल. आयएमडीच्या अंदाजानुसार, यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे.

## अरुणाचल प्रदेशमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस ला मोठे यश



● पुणे प्रतिनिधी :

एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी अवघे काही तास राहिले असताना दुसरीकडे अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांचे निकाल आले. यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसअजित पवार गटाचे तीन आमदार निवडून आले. यानंतर आता पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी या आमदारांच्या विजयाबाबत आनंद व्यक्त करत प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अरुणाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत एकूण १५ जागा लढवल्या होत्या. त्यापैकी तीन उमेदवार निवडून आले आहेत. तर एका उमेदवाराचा दोन मतांनी पराभव झाला, तर दुसरा उमेदवार २०० मतांनी पराभूत झाला. अरुणाचल प्रदेश विधानसभेत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपाचे ४६ आमदार निवडून आले आहेत. राष्ट्रवादीने अरुणाचल प्रदेशमध्ये यश मिळाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली.

अरुणाचल प्रदेश येथे पार पडलेल्या विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ३ उमेदवार निवडून आल्याबद्दल तिन्ही उमेदवारांचे मनापासून अभिनंदन करतो. हा विजय ऐतिहासिक असून, या निवडणुकीत अरुणाचल प्रदेशमधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतलेले अथक परिश्रम फळास आले आहेत. त्यामुळे त्यांचे देखील अभिनंदन करतो. विशेष बाब म्हणजे एकूण मतांच्या १०.०६ टक्के मते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पदरात पडली, याचा फार आनंद आहे. अरुणाचल प्रदेशच्या मतदारराजाने आमच्या पक्षाच्या उमेदवारांवर दाखवलेला विश्वास हीच आमची ताकद असून, याच ताकदीच्या जोरावर यापुढे विकासाची गंगा अरुणाचल प्रदेशमध्ये वाहेल असा शब्द देतो, असे अजित पवार यांनी सांगितले.

दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची विकासाची पावले पुढे पडत आहेत. अरुणाचल प्रदेशमधील यश हे पक्षाच्या प्रगतीचे द्योतक आहे. लोकशाहीची मुल्ये अंगीकारून आमचा पक्ष देशभर विकासाचे नवनवे आदर्श उभे करेल यात काही शंका नाही.

## दिल्ली-मुंबई विमानाला बॉम्बने उडवण्याची धमकी; अहमदाबादमध्ये ईमर्जन्सी लॅंडिंग




● दिल्ली प्रतिनिधी :

गेल्या काही दिवसांपासून भारतीय विमानांना बॉम्बने उडवण्याच्या धमक्या मिळत आहेत. आता आज दिल्लीहूनमुंबईला जाणाऱ्या Akasa Air च्या विमानात बॉम्ब ठेवल्याची माहिती समोर आली आहे. या वृत्तामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. यानंतर पायलटने तात्काळ विमानाची अहमदाबादमध्ये ईमर्जन्सी लॅंडिंग केली. विशेष म्हणजे, यावेळी विमानात 186 प्रवाशांसह 6 क्रू मेंबर्स होते. आकासा एअरच्या प्रवक्त्याने सांगितले की, 03 जून 2024 रोजी दिल्लीहूनमुंबईला उड्डाण केलेल्या फ्लाइट QP 1719 मध्ये बॉम्ब असल्याचा अलर्ट आला. यानंतर विमान अहमदाबादच्या दिशेने वळवण्यात आले. पायलटने सर्व आवश्यक आपत्कालीन प्रक्रियेचे पालन केल्यानंतर सकाळी 10:13 वाजता विमानाची सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे लॅंडिंग झाली आणि सर्व प्रवाशांना विमानातून उतरवण्यात आले. विमान लॅंड झाल्यानंतर सुरक्षा यंत्रणेने विमानाची सखोल तपासणी केली, पण सुदैवाने त्यात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.

यापूर्वी मिळालेल्या अशा धमक्या

यापूर्वी चेन्नईहून मुंबई आणि दिल्लीहून वाराणसीला जाणाऱ्या विमानांमध्येही बॉम्ब असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. बॉम्बच्या धमक्या मिळताच सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आणि या प्रकरणाचा तपास सुरू केला. आधी विमानातील सर्व प्रवाशांना सुखरुप उतरवून विमानाची तपासणी करण्यात आली, पण त्यात काहीच संशयास्पद आढळले नाही.

### पॅरिसवरुन मुंबईला येणाऱ्या विमानात बॉम्ब

दरम्यान, रविवार(दि.2) फ्रान्सची राजधानी पॅरिस येथून मुंबईत येणाऱ्या विस्तारा कंपनीच्या विमानात बॉम्ब असल्याचे वृत्त समोर आले होते. यासंदर्भातील पत्र मिळाल्यामुळे क्रू-मेंबर्स आणि 306 प्रवाशांमध्ये प्रचंड खबराट पसरली. यानंतर तात्काळ विमानाची मुंबई विमानतळावर इमर्जन्सी लॅंडिंग करण्यात आली. सुदैवाने त्या विमानातदेखील कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.

## भाजपाकडून विधान परिषदेसाठी तीन उमेदवार जाहीर



● मुंबई प्रतिनिधी :

विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू असतानाच भाजपाने तीन मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार जाहीर केले आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघामध्ये भाजपाने विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांना उमेदवारी दिली आहे. तर मुंबई पदवीधर मतदारसंघात किरण शेलार आणि आणि मुंबई शिक्षक मतदारसंघात शिवनाथ दराडे यांना भाजपाने संधी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आटोपत असतानाच महाराष्ट्रात विधान परिषदेच्या चार जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. कोकण पदवीधर, मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक आणि नाशिक शिक्षक मतदारसंघांसाठी निवडणूक होत असून, या निवडणुकीसाठी महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू असतानाच भाजपाने तीन मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार जाहीर केले आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघामध्ये भाजपाने विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांना उमेदवारी दिली आहे. तर मुंबई पदवीधर मतदारसंघात किरण शेलार आणि आणि मुंबई शिक्षक मतदारसंघात शिवनाथ दराडे यांना भाजपाने संधी दिली आहे.

## बहिणीला प्रियकरासोबत पाहताच संतापला भाऊ; वडिलांसह मिळून केली मुलाची निर्घृण हत्या

● नवी मुंबई प्रतिनिधी :

नवी मुंबईतून एका १८ वर्षीय मुलाच्या हत्येची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नवी मुंबईपोलिसांनी दोघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेले दोघेही पिता पुत्र आहेत. घरात बहिणीला प्रियकरासोबत पाहिल्यानंतर संतापलेल्या बाप लेकाने १८ वर्षीय मुलाची हत्या केली. या सगळ्या प्रकारामुळे नवी मुंबई परिसरात खळबळ उडाली आहे.

वडिलांसोबत मिळून भावाने बहिणीच्या १८ वर्षीय प्रियकराची हत्या केल्याचा प्रकार नवी मुंबईतील टाऊनशिप येथे घडला. रविवारी दुपारच्या सुमारास आरोपीच्या बहिणीने तिच्या प्रियकराला घरी बोलावले होते. मात्र भाऊ आणि वडिलांना हा प्रकार समजात त्यांनी १८ वर्षीय तरुणाच निर्घृणपणे हत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली



आणि मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवून दिल्याची माहिती तळोजा पोलिसांनी दिली.

समीर अब्दुल शेख (१८) असे हत्या झालेल्या मुलाचे नाव आहे. समीरच्या मैत्रिणीने त्याला रविवारी दुपारी तरुणीने पनवेल येथील देवाचा पाडा येथे घरी बोलवले होते. मात्र त्याचवेळी तरुणीचा भाऊ कामावरून लवकर घरी पोहोचला. त्याने दरवाजा ठोठावला असता त्याच्या बहिणीने तो उघडला नाही. आरोपीने दरवाजा तोडला असता त्याला त्याची बहीण प्रियकर समीर अब्दुल शेख (१८) याच्यासोबत सापडली. त्याचवेळी आरोपी भावाने याने तात्काळ वडिलांना फोन करून बोलवून घेतले. त्यानंतर दोघांनी घरातील लोखंडी फावडे व कुऱ्हाडीने वार करत समीर शेखचा खून केला. या मारहाणीत समीरचा जागीच मृत्यू झाला.

माहिती मिळताच तळोजा पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. पोलिसांनी दोघांविरोधात भारतीय दंडसहिता ३०२ आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

वाढदिवसाचा केक उशीरा आणल्याने पत्नी, मुलावर चाकूने हल्ला

मुंबईच्या साकीनाका परिसरात वाढदिवसाचा केक उशीरा आणल्यामुळे ४५ वर्षीय व्यक्तीने पत्नी व मुलावर चाकूने हल्ला केला. याप्रकरणी साकीनाका पोलिसांनी आरोपी राजेंद्र शिंदेविरोधात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

## खंडेराजुरीत लग्नाच्या वरातीत तरुणाचा चाकूने भोसकून खून



● मिरज प्रतिनिधी :

खंडेराजुरी ता. मिरज येथे रविवारी रात्री लग्नाच्या वरातीत सुमित जयंत कांबळे (वय २१) या तरुणाचा सुरज सचिन आठवले व साथीदारानी चाकूने भोसकून खून केला. रंगपंचमीदिवशी रंग लावण्याच्या वादातून व पूर्व वैमनस्यातून सुरज आठवले व साथीदारानी सुमित कांबळे यास लग्नाच्या वरातीत नाचताना पोटात व छातीवर चाकूचे सपासप वार करून ठार मारले.

सुरज आठवले हा गुन्हेगारी वृत्तीचा असून यापूर्वी त्याने गणेशोत्सवात खंडेराजुरीत एका तरुणावर चाकूहल्ला केला होता. खिद्रापूर येथील आठवले याचे खंडेराजुरी आजोळ असून गावात त्याने दहशत निर्माण केली होती. गावातील सुमित कांबळे याच्याशी रंगपंचमीला रंग लावण्याच्या वादातून सूरजचा वाद झाला होता. या वादातून सूरजने सुमित यास बघून घेण्याची धमकी दिली होती.

रविवारी रात्री गावात सुमित धनसरे यांच्या लग्नाच्या वरातीत सुमित कांबळे हा डीजेवर नाचत होता. यावेळी सूरज व त्याच्या साथीदारांनी रंग पंचमीला झालेल्या वादाचा जाब विचारत सुमित

## शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज


### शिवभक्तांच्या सोयी सुविधांसाठी किल्ले रायगडावर जय्यत तयारी

● महाड प्रतिनिधी :

येत्या ६ जून रोजी किल्ले रायगडावर प्रतिवर्षाप्रमाणे ३५१ वा श्री शिवराज्याभिषेक सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्याकरता राज्याच्या कानाकोपऱ्यासह देशभरातून लाखो शिवभक्त दाखल होत असतात. या शिवभक्तांच्या सोयी सुविधांसाठी रायगडावर प्रशासनामार्फत जय्यत तयारी केली गेली आहे.

किल्ले रायगड आणि परिसरामध्ये सुमारे २००० पोलिसांसह सातशे कर्मचारी तैनात राहणार आहेत.

किल्ले रायगडावर अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या माध्यमातून गेली काही वर्ष छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. वर्षानुवर्षी या सोहळ्याकरता शिवभक्तांची गर्दी



वाढतच चालली आहे यामुळे गडावर आणि परिसरामध्ये प्रशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर गेली काही दिवस प्रशासनामार्फत सातत्याने बैठका घेतल्या जात आहेत. यावर्षी देखील लाखो शिवभक्त गडावर दाखल होतील अशी अपेक्षा आहे यामुळे प्रशासनामार्फत जय्यत तयारी सुरू केली गेली आहे. या सोहळ्यासाठी २००० पोलीस किल्ले रायगड आणि परिसरामध्ये तैनात राहणार आहेत, तर ७०० शासकीय कर्मचारी आणि १२० स्वयंसेवक या ठिकाणी काम करणार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अतुल झेंडे यांच्यासह अन्य दोन पोलीस उपाधीक्षक, ११ पोलीस उपविभागीय अधीकारी, २८ पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक, १४० पोलीस उपजिल्हाध्यक्ष, ९०० पोलीस कर्मचारी १३५ वाहतूक पोलीस तसेच पोलीस दलाची विविध पथके या ठिकाणी दाखल होणार आहेत.

किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा देखील प्रशासनाकडून करण्यात आले आहे. याकरिता गडावरील विविध ठिकाणी असलेल्या तलावातील पाणी एकत्रित केले आहे. त्याचप्रमाणे गडावर पिण्याच्या पाण्याची असुविधा होऊ नये म्हणून प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात पुरवण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पाण्याच्या टॅंकरचे देखील नियोजन करण्यात आले आहे.

## कोथिंबीर, हिरव्या मिरचीने बिघडवले गृहिणींचे बजेट

● नागपूर प्रतिनिधी :

कडक उन्हाळ्यात भाजीपाल्यांच्या दरवाढीने गृहिणींचे स्वयंपाकघराचे बजेट बिघडले आहे. सध्या कोथिंबीर आणि हिरव्या मिरच्यांचे भाव आकाशाला भिडले असून किरकोळमध्ये कोथिंबीर २०० रुपये आणि हिरव्या मिरचीची ८० ते ९० किलो दराने विक्री होत आहे. किरकोळमध्ये काही भाज्यांचे भाव जास्तच आहेत. काही महिन्यांआधी टोमॅटो सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले होते, हे विशेष.

कळमना बाजार तीन दिवस बंद

मतमोजणीमुळे कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीतील सातही बाजाराचे व्यवहार ५ जूनपर्यंत बंद आहेत. मुख्यत्त्वे फळे आणि भाज्यांची आवक बंद राहिल्याचा



परिणाम दरवाढीवर झाला आहे. लगतचे जिल्हे आणि अन्य राज्यातील उत्पादक शेतकऱ्यांनी भाज्या कळमना बाजारात विक्रीसाठी आणणे बंद केले आहे. त्याच कारणांनी कॉटन मार्केटमध्ये आवक वाढली आहे.

३०० पोते मिरची तर कोथिंबीरची आवक फार कमी

महात्मा फुले फळ व सब्जी अडतिया असोसिएशनचे (कॉटन मार्केट) सचिव राम महाजन म्हणाले, सध्या बाजारात ६० ते ७० लहानमोठ्या गाड्या विक्रीसाठी येत आहे. दरदिवशी ८०० पोत्यांपर्यंत (प्रति पोते ४० किलो) होणारी आवक सध्या ३०० वर आली आहे. पंजाब आणि रायपूरहून आवक आहे. किरकोळमध्ये ८० ते ९० रुपये भाव आहे. किरकोळमध्ये कोथिंबीर २०० रुपयांवर गेल्यामुळे गृहिणींनी खरेदी थांबविली आहे. सध्या थोडीफार आवक छिंदवाडा, सौंसर, रामकोना या भागातून होते. सध्या लिंबू दर्जानुसार ५०० ते ६०० रुपये शेकडा आहे. किरकोळमध्ये १० ते १२ रुपये नग भाव आहे.

पालेभाज्या महागच

कडक उन्हामुळे आवक कमी असल्याने पालेभाज्या महाग आहेत. किरकोळमध्ये पालक ७० ते ८०, मेथी १००, चवळी ४०, घोळ भाजी ५० रुपये किलो आहे.